
पाक्षिक प्रदेश बीजेपी

# मनोगत

मुंबई । वर्ष: 06 । अंक: 6 । 16 मार्च, 2024 । पृष्ठसंख्या: 36 । किंमत: 5 रू.



# विकसित भारतासाठी साथ द्या



## अध्यक्षीय मनोगत

# ‘सीएए’विरोधी अपप्रचार हाणून पाडा

पश्चिम बंगालमधील महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमुळे देशभर संतापाची लाट उसळली. या अत्याचारामागे पश्चिम बंगालमध्ये सत्ता असलेल्या तृणमूल काँग्रेसचा नेताच होता. या नेत्याला वाचवण्यासाठी ममता बॅनर्जी सरकारने अनेक प्रयत्न केले. मात्र न्यायालयाच्या दणक्यामुळे अखेर त्याला केंद्रीय गुप्तचर विभागाकडे सोपवावे लागले. ही घटना उघडकीस आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीडित महिलांची भेट घेतली. पंतप्रधानांच्या भेटीमुळे पीडित महिलांना आपण एकाकी नसून केंद्र सरकार आपल्या पाठीशी आहे, असा दिलासा मिळाला. पंतप्रधानांच्या या कार्यक्रमाच्या निमित्ताने संघटनेने संपूर्ण देशभर ‘नारी शक्ति वंदन’ अभियान राबवले. या अभियानानिमित्त नारी शक्तिच्या सन्मानार्थ विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अनेक ठिकाणी नारी शक्ति दौड कार्यक्रमही झाले. महिला मोर्चाने संपूर्ण राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. मोदी सरकारने अलिकडेच नागरिकत्व सुधारणा (सीएए) कायद्याची अंमलबजावणी करण्याचे जाहीर केले. हा कायदा मुस्लिमांच्या विरोधात आहे, असा खोडसाळ प्रचार कायदा मंजूर झाल्यानंतर सर्व विरोधकांनी केला होता. कोरोना संकटामुळे या कायद्याची अंमलबजावणी लांबणीवर पडली होती. आता हा कायदा अंमलात आला आहे. या कायद्यातील नेमक्या तरतुदी काय आहेत, याची माहिती देणारे लेख या अंकात आहेत. लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनीही हे लेख आवर्जुन वाचले पाहिजेत. विरोधकांकडून या कायद्याबाबत गैरसमज निर्माण करण्याचे मोठे प्रयत्न होत आहेत, हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी सर्वांनी या कायद्याची माहिती घेतली पाहिजे. लोकसभा निवडणुकीत या कायद्याच्या अनुषंगाने मुस्लिम धर्मियांना भडकावून मतपेटीद्वारे त्याचा फायदा मिळवण्याचा प्रयत्न विरोधक करणार यात शंका नाही. भारतीय जनता पार्टी विरोधात अल्पसंख्याक समाजाच्या मनात विष पेरण्याचे काम काँग्रेस, समाजवादी, कम्युनिस्ट विचारधारेतील मंडळींनी अनेक वर्षे इमाने इतबारे केले आहे. मात्र आता मुस्लिम धर्मियांना आजवर काँग्रेस, कम्युनिस्ट आणि समाजवाद्यांनी आपला वापर फक्त मतांसाठी केला, हे लक्षात येऊ लागले आहे. मोदी सरकारने अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. या योजनांची माहिती सामान्य मुस्लिमांपर्यंत नेण्यासाठी अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुल्तानी आणि त्यांचे सहकारी विविध मार्गांनी प्रयत्नशील आहेत. मुस्लिम धर्मियातील अत्यंत गरीब अशा पासमंदा मुस्लिमांचे मेळावेही अल्पसंख्याक मोर्चातर्फे घेण्यात आले. अल्पसंख्याक मोर्चाच्याच नव्हे तर पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी सर्व सामान्य मुस्लिमांपर्यंत मोदी सरकारच्या कल्याणकारी योजनांची माहिती पोहचवली पाहिजे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झोपडपट्टी आणि वस्ती ‘संपर्क अभियान’ आपल्याला वेगाने पूर्ण करायचे आहे. निवडणुका घोषित झाल्या आहेत. त्याच्या तयारीसाठी पूर्ण जोशात तुम्हा-आम्हा सर्वांना मैदानात उतरायचे आहे. आपला विजय निश्चित आहेच, हा विजय आणखी शानदार करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावयाचे आहेत.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




०६ नारी शक्ति वंदन





११ भारतातील मुस्लिमांचा 'सीएए'शी संबंधच नाही




१३ नागरिकत्व सुधारणा कायदा हा धर्मनिरपेक्षतेशी सुसंगतच



१६ ३७० कलम रद्द झाल्यामुळे विकसित काश्मीर साकारते आहे



१९ जम्मू-काश्मीरच्या लाभार्थ्यांशी पंतप्रधान मोदी यांनी साधला संवाद



२२ प्रातिनिधिक लोकशाही लोकप्रिय! मोदींना तिस-यांदा पसंती !!






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

**संपादकीय सल्लागार**

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर–वीर

**विभागीय समन्वयक**

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई –२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२–२२०२२०५०



# विकसित भारतासाठी साथ द्या

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनतेला उद्देशून खुले पत्र लिहिले आहे. या पत्राचा भावानुवाद.**

**माझ्या प्रिय कुटुंबियांना सादर प्रणाम,**

**तुमच्याशी** माझा ऋणानुबंध जुळून आता १० वर्षांचा कालावधी होत आहे. या काळात १४० कोटी भारतीयांनी मला जे अभूतपूर्व प्रेम दिलं, माझ्यावर प्रचंड विश्वास दाखविला, त्याबद्दल मी आपला शतशः ऋणी आहे. या काळात तुमच्याबरोबर स्नेहबंधातून तयार झालेले अनोखे नाते माझ्यासाठी अत्यंत वेगळे आणि म्हणूनच वेगळे आहे. या नात्याचे वर्णन शब्दांत करणे माझ्यासाठी अत्यंत कठीण आहे. गेल्या १० वर्षांत आमच्या सरकारच्या कार्यकाळात सर्वसामान्य भारतीयांच्या जीवनात आलेले सकारात्मक बदल हीच माझी काम करण्याची ऊर्जा आहे. गेल्या दहा वर्षांत आमच्या सरकारने गोरगरीब, शेतकरी, युवक, महिला या ४ वर्गांच्या उन्नतीसाठी प्रामाणिक प्रयत्न केले. या ४ समाज घटकांसाठी आमच्या सरकारने घेतलेले निर्णय हीच आमची मोठी कामगिरी आहे, हाच आमचा मोठा ठेवा आहे. या ४ घटकांना केंद्रस्थानी ठेवूनच आमच्या सरकारचे प्रत्येक धोरण आखले गेले. अनेक निर्णय घेताना या चार समाज घटकांच्या जीवनात कसा बदल घडून येईल, त्यांचे राहणीमान कसे सुधारेल हाच विचार आमच्या मनात होता. आम्ही प्रामाणिकपणे केलेल्या प्रयत्नाचे परिणाम संपूर्ण देशासमोर आज आहेत. पंतप्रधान आवास योजनेसारख्या योजनेतून कोट्यवधी गोरगरिबांचे मालकीच्या घराचे स्वप्न पूर्ण झालं आहे. देशातील प्रत्येक घरात वीज पोहचली आहे. लाखो नागरिकांना घरी नळाद्वारे पिण्याचे पाणी मिळत आहे. सुमारे १० कोटी महिलांना स्वयंपाक करण्यासाठी गॅसची व्यवस्था करण्यात आली आहे. आयुष्मान योजनेद्वारे गोरगरीब नागरिकांना ५ लाख रु. पर्यंतचे वैद्यकीय उपचार मोफत मिळण्याची सोय उपलब्ध झाली आहे. मातृ वंदना सारख्या योजनेतून गर्भवती महिलांना मदत मिळत आहे. हे सर्व तुमच्या माझ्यावरील विश्वासामुळेच शक्य झालं आहे.

आपला देश सध्या वेगाने प्रगती करतो आहे. ही प्रगती करीत असताना गौरवशाली भारतीय परंपरा आणि आधुनिकता याचा अपूर्व समन्वय साधला गेला आहे. गेल्या दहा वर्षांत भविष्यावर नजर ठेवून अनेक पायाभूत सुविधाची निर्मिती करण्यात आली. हे करत असताना भारताचा हजारो वर्षांचा उच्च आणि अभिमानास्पद सांस्कृतिक वारसा अभिमानाने जपण्यासाठी आमच्या सरकारने प्रयत्न केले. देशाच्या पुरातन संस्कृतीचा









**मोदी सरकारने गेल्या १० वर्षांत गोरगरीब, युवक, शेतकरी आणि महिला अशा चार वर्गांसाठी विविध योजना आखल्या. या योजनांमुळे या चार वर्गाचे जीवनमान बदलून गेले आहे. भारताची अर्थव्यवस्था अन्य प्रगत देशांच्या बरोबरीला आणायची असेल तर या चार घटकांच्या विकासाकडे लक्ष द्यायला हवे हे ओळखून मोदी सरकारने आपल्या धोरणाची आखणी केली.**

अभिमान बाळगतच आपण विकसित भारताच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहोत, याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे.

१४० कोटी भारतीयांनी दाखविलेल्या विश्वासामुळे, भक्कम पाठिंब्यामुळेच गेल्या दहा वर्षांत आमच्या सरकारला अनेक ऐतिहासिक निर्णय घेता आले. वस्तू आणि सेवा कर (जीएसटी), ३७० वे कलम रद्द करणे, तिहेरी तलाक रद्द करणे, नारी शक्ति वंदन अधिनियम या सारखे देशाचे भविष्य उज्वल बनविणारे महत्वाचे निर्णय आम्ही घेतले. याच काळात देशासाठी नवे संसद भवन बांधले गेले. हे निर्णय घेत असतानाच दहशतवादी शक्तींचा, नक्षली शक्तींचा बंदोबस्त करण्यासाठी कठोर निर्णय घेण्यात आले.

सरकार आणि जनता मिळून काम करत असेल तेंव्हाच लोकशाही अधिक मजबूत होते. म्हणूनच आमच्या सरकारने गेल्या दहा वर्षांत जनभागीदारीला प्राधान्य दिले आहे. सामान्य माणसाच्या खंबीर पाठिंब्यामुळेच मी देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी धाडसी निर्णय घेऊ शकलो. जनतेचे पाठबळ असल्यामुळेच देशाच्या विकासासाठी महत्वाकांक्षी योजना आमचे सरकार आखू शकले आणि या योजणांची यशस्वी अंमलबजावणीही करू शकले. आम्ही विकसित भारताचा संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. या प्रयत्नंनाना तुमच्या सूचना, कल्पना यांची साथ हवी आहे. जगात आपला देश समृद्ध, बलशाली म्हणून ओळखला जावा यासाठी तुम्ही तुमच्या सूचना आम्हाला जरूर कळवा. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी तुमचा पाठिंबा मला हवा आहे.आपला देश यापुढील काळात विकासाचे शिखर गाठेल, असा मला विश्वास आहे.

**तुम्हा सर्वांना उज्वल भविष्यासाठी खूप खूप शुभेच्छा.**

**तुमचा**

**नरेंद्र मोदी**

# नारी शक्ति वंदन



पश्चिम बंगालमधील संदेशखाली येथे महिलांवर झालेल्या अत्याचाराची घटना नुकतीच उघड झाली. या घटनेबद्दल देशभरातून प्रचंड संताप व्यक्त झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलिकडेच संदेशखालीमधील पीडित महिलांची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. पंतप्रधानांच्या दौऱ्यात महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात पंतप्रधान मोदी यांनी केलेल्या भाषणाचा संपादित अंश.

**भारताला** विकसित करण्यासाठी स्त्रीशक्तीला जास्तीत जास्त संधी देणे आवश्यक आहे. भाजप सरकारमुळे आज प्रत्येक क्षेत्रात महिलांसाठी नवनवीन मार्ग तयार होत आहेत. जिथे जिथे इंडिया आघाडीचे सरकार आहे तिथे महिलांवर प्रचंड अत्याचार होतात. आज देशाच्या प्रथम नागरिक, आपल्या राष्ट्रपती, आदिवासी समाजात जन्मलेली मुलगी आहे. लोकसभेत महिला आरक्षणाची हमी पूर्ण झाली आहे. मुस्लिम महिलांना तिहेरी तलाकपासून मुक्ततेची हमी दिली होती, तीही पूर्ण झाली. टीएमसी, डावे आणि काँग्रेस तेव्हा कट्टरवाद्यांच्या पाठीशी उभे होते आणि आजही त्यांच्यासोबत आहेत. येथे तृणमूल सरकारने कधीही बेटी बचाओ योजना लागू होऊ दिली नाही. उज्वला योजना आणि स्वस्त सिलिंडर योजनाही राबवण्यात आल्या नाहीत. येथील १४ लाखांहून अधिक अर्ज सरकारकडे प्रलंबित आहेत. भाजप सरकार बहिणी-मुलींचे छोटे छोटे प्रश्न सोडवण्यात व्यस्त आहे. आम्ही मोहिमा राबवल्या, योजना आखल्या. स्वस्त सॅनिटरी पॅड बनवण्याची योजना आणली. आम्ही गर्भवती महिलांना मोफत लसीकरण आणि ५,००० रुपयांची मदत देण्याची योजना आखली. आशा आणि अंगणवाली कर्मचाऱ्यांना पाच लाख रुपयांची विमा योजना देण्याचा निर्णय घेण्यात आला. मुलींसाठी सर्वत्र शौचालये बांधली. जी घरे गरिबांना दिली जात आहेत, ती महिलांच्या नावावर नोंदवली जातात. बंगालमध्ये अशी २४ लाख घरे आहेत.

भाजपने महिलांसाठी आणखी एक मोठी योजना आणली आहे. मोदी सरकारने गावातील भगिनींसाठी नमो ड्रोन दीदी योजना सुरू केली आहे. यासह बहिणींना ड्रोन पायलट म्हणून प्रशिक्षण दिले जात आहे. यामुळे शेतीचे आधुनिकीकरण होईल आणि बहिणींनाही अतिरिक्त उत्पन्न मिळेल. इंडी आघाडी काय करत आहे हे जाणून घेणे देखील महत्त्वाचे आहे. केंद्र जे काही योजना बनवते, या आघाडीतील राज्य सरकारे त्यांची अंमलबजावणी करत

## मोदी सरकारची ड्रोन दीदी योजना



केंद्र सरकारने अंतरिम अर्थसंकल्पात नमो ड्रोन दीदी योजनेसाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. हा आकडा गेल्या वर्षीच्या २०० कोटी रुपयांपेक्षा २.५ पट जास्त आहे. नमो ड्रोन योजनेसाठी वाढलेला निधी कृषी क्षेत्रात ड्रोन तंत्रज्ञानाला चालना देण्यासाठी सरकारची वचनबद्धता दर्शवते. महिलांचे सक्षमीकरण आणि कृषी क्षेत्रातील उत्पादकता वाढवण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे.

## प्रशिक्षणात काय शिकवले जाईल?

नमो ड्रोन दीदी योजनेअंतर्गत महिलांना ड्रोन उडवणे, डेटा विश्लेषण आणि ड्रोनची देखभाल करण्याचे प्रशिक्षण दिले जाईल. त्यांना ड्रोनच्या सहाय्याने विविध कृषी कामकाजाचे प्रशिक्षणही दिले जाईल. यामध्ये पिकांचे निरीक्षण, कीटकनाशके आणि खतांची फवारणी आणि बियाणांची पेरणी यांचा समावेश आहे.

## नमो ड्रोन योजनेचा फायदा

ड्रोन दीदी योजनेचे अनेक फायदे होतील. यातून महिला सक्षमीकरणाला प्रथम प्राधान्य आहे. ही योजना त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवेल. यामुळे कृषी क्षेत्रातील उत्पादकता आणि कार्यक्षमता वाढण्याची अपेक्षा आहे. या योजनेमुळे शेतीवरील खर्च कमी होऊ शकतो. त्यामुळे रोजगाराच्या संधीही वाढतील. नमो ड्रोन दीदी योजना हा भारत सरकारचा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे.

## १० लाख महिलांना प्रशिक्षण

पुढील ३ वर्षात १० लाख महिलांना ड्रोन उडवण्यासाठी आणि शेतीमध्ये ड्रोन वापरण्यासाठी प्रशिक्षित करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. सरकार ड्रोनसाठी प्रशिक्षण केंद्र, दुरुस्ती केंद्र आणि चार्जिंग स्टेशन तयार करणार आहे. तसेच सरकार ड्रोन तंत्रज्ञानाच्या विकासासाठी संशोधन आणि विकासाला चालना देणार आहे. याशिवाय सरकार ड्रोन स्टार्टअप्सना आर्थिक आणि तांत्रिक मदत करेल.

## ड्रोन दीदी योजना कधी सुरू झाली?

नमो ड्रोन दीदी योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२२ मध्ये सुरू केली होती. या अंतर्गत येत्या ५ वर्षात १ लाख महिलांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. ही योजना देशभरातील कृषी विज्ञान केंद्रांद्वारे राबविण्यात येणार आहे.

नाहीत. बंगालमध्ये १६ लाखाहून अधिक बहिणी लखपती दीदी झाल्या आहेत. मुद्रा योजनेतून हमी न घेता कर्ज घेऊन व्यवसाय सुरू केलेल्या माता-भगिनी आहेत. बंगालच्या बहिणींना १.२५ लाख कोटींहून अधिक पैसे मिळाले आहेत. देशातील सुमारे ३ कोटी महिला शेतकऱ्यांनाही प्रथमच पीएम किसान सन्मान निधीकडून पैसे मिळाले आहेत. आमच्या इथल्या बहिणी मोठ्या संख्येने कारागीर आहेत. त्यांच्यासाठी पीएम विश्वकर्मा योजना आहे. यासाठी १३ हजार कोटींहून अधिक रुपये खर्च केले जात आहेत. तुमच्यासारख्या खेड्यापाड्यात राहणाऱ्या बहिणींना लखपती दीदी बनवण्याचा भाजप सरकारचा प्रयत्न आहे. देशातील तीन कोटी भगिनींना करोडपती बनवण्याचे लक्ष्य आम्ही ठेवले आहे. जेव्हा प्रत्येक गावात अनेक लखपती दीदी असतील, तेव्हा त्या गावाचे चित्र आणि नशीब कसे बदलेल? आत्तापर्यंत देशात एक कोटीहून अधिक लखपती दीदी निर्माण करण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. १० वर्षात बँकांनी स्वयंरोजगारासाठी बचत गटांना ८ लाख कोटी रुपयांची मदत दिली आहे. यामध्ये बंगालला ९० हजार कोटी रुपयांची मदत मिळाली आहे. या गटांची ताकद पाहून मी एका बैठकीत सांगितले होते की हे राष्ट्रीय समर्थन गट आहेत. या रकमेतून बंगालमधील महिलांनी शेती, कुटीर उद्योग, मत्स्यपालन, मधशेती आणि हस्तकला अशी विविध कामे केली आहेत. ■





**लोणावळा– नारी शक्ति मॅरेथॉन– उपस्थिती–** महिला मोर्चा प्रदेश अध्यक्ष चित्रा वाघ, सुरेखा जाधव, कविता हिंगे, बिंद्रा गणत्रा आदी.



**नंदुरबार– उपस्थिती–** प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, जिल्हाध्यक्ष निलेश माळी, डॉ.सपना अग्रवाल, सरिता चौधरी, रोशनी राजपूत, रेखा चौधरी, प्रतिभा चौधरी, डॉ. तेजल चौधरी आदी.



**नांदेड– उपस्थिती–** महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष प्रणिता चिखलीकर, नांदेड जिल्हाध्यक्ष श्रद्धा चव्हाण, डॉ.शितल भालके, वैशाली देशमुख, शततारखा पांढरे, महादेवी मठपती, कांचन गहलोत आदी.



**पिंपरी–चिंचवड– उपस्थिती–** आ.अश्विनी जगताप, माजी महापौर माई ढोरे, आरती चोंधे, अंजली देशपांडे, पल्लवी जगताप, मंडल अध्यक्षा शोभा जांभुळकर, वैशाली जवळकर, कोमल गोंडाळकर, कावेरी जगताप आदी.



**चंद्रपूर– उपस्थिती–** सांस्कृतिक व वन मंत्री सुधीर मुनगंटीवार, महानगर जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, महिला आघाडीच्या अध्यक्षा सविता काढे आदी.




**जिंतुर (जि.परभणी)– उपस्थिती–** आ. मेघना बोर्डीकर, महिला जिल्हाध्यक्ष डॉ. विद्या चौधरी, तालुकाध्यक्ष ॲड. विनोद राठोड आदी.



**शेवगांव–पाथर्डी (जि. अहमदनगर)– उपस्थिती–** आ. मोनिका राजळे, पाथर्डी महिला अध्यक्षा काशि गोल्हार, पाथर्डी शहर अध्यक्षा ज्योती मंत्री, नगरसेविका मंगल कोकाटे, दुर्गा भगत, सुनिता काटे, स्मिता लाड, ज्योती शर्मा आदी.



**दक्षिण सोलापूर– उपस्थिती–** भाजपा जिल्हा सरचिटणीस मनीष देशमुख, अर्चना वडनाळ, रंजीता चाकोते, शोभा नष्टे, शोभा बनशेट्टी कांचन यन्नम, महिला शहराध्यक्ष विजया वड्डेपल्ली, इंद्रा कुडक्याळ, संपदा जोशी, रोहिणी तडवळकर, अश्विनी चव्हाण, राजश्री बिराजदार, संगीता जाधव, वरलक्ष्मी पुरुड, मीनाक्षी कंपली, मनीषा हुच्चे, निलीमा हिरेमठ, निलीमा शितोळे, अंबिका पाटील, वृषाली पवार, दीपाली व्हनमाने, श्वेता व्हनमाने.




**वांद्रे (पूर्व) येथे आयुष्मान कार्ड वाटप– उपस्थिती–** खा.पूनम महाजन, महिला मोर्चा जिल्हा महामंत्री रश्मी मालुसरे आदी.



**नवी मुंबई– उपस्थिती–** महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष माधुरी सुतार, प्रदेश उपाध्यक्ष प्रा.वर्षा भोसले, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, सागर नाईक, सुजाता पाटील, शिल्पा कांबळे, जयश्री ठाकूर, रेखा म्हात्रे, जयश्री दंडवते, शैला पाटील, सरस्वती पाटील, जयेंद्र अरुण सुतार, प्रभाकर ठाकूर, नरेश सुतार, जगदीश पाटील, भाऊ भापकर, वैभव भास्कर, कुणाल महाडिक आदी.






**भिवंडी– उपस्थिती–** आ. महेश चौघुले, जिल्हाध्यक्ष ॲड. हर्षल पाटील, यशवंत टावरे, महिला मोर्चा प्रदेश सचिव ममता परमानी, प्रदेश सदस्या रेखा पाटील, महिला मोर्चा अध्यक्षा सुनीता टावरे आदी.

# भारतातील मुस्लिमांचा 'सीएए'शी संबंधच नाही




● डॉ. विनय सहस्त्रबुद्धे

> नागरिकत्व सुधारणा कायदा या विषयावर देशभर मोठी चर्चा चालू आहे. हा कायदा नेमका काय आहे, त्याचे परिणाम समाजातील कोणत्या घटकांवर होणार आहेत याची माहिती जाणून न घेताच काही विरोधी पक्षांनी या कायद्याबाबत अपप्रचार सुरु केला आहे. अपप्रचार मोहीम सुरु करण्यामागे स्पष्ट उद्देश आहे तो म्हणजे देशाला पुन्हा मतपेढीच्या राजकारणाकडे नेणे. मतपेढीच्या राजकारणाने आपल्याला पुन्हा देशाच्या राजकारणात स्थान मिळवता येईल अशा अपेक्षेने आप तृणमूल आणि अन्य पक्षांनी नागरिकत्व सुधारणा कायदा या विषयाचे राजकारण करण्यास सुरुवात केली आहे. या कायद्याच्या मुद्द्यावरून विशिष्ट धर्मियांची माथी भडकविण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**शाह** बानो प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल आणि राम जन्मभूमी आंदोलन यामुळे काँग्रेससह अनेक पक्षांना आपल्या धर्मनिरपेक्षतेच्या भूमिकेवर बचावात्मक पवित्र घ्यावा लागला. दांभिक धर्मनिरपेक्षतेविरुद्ध समाजात जागरुकता निर्माण झाल्यामुळे भारतीय जनता पक्ष वगळता अन्य पक्षांना मतपेढीच्या राजकारणाचा पुनर्विचार करणे भाग पडले. काँग्रेसने तर चक्क सौम्य हिंदुत्ववादाचे सोंगही अलीकडच्या काळात अनेकवेळा घेतले आहे. या पक्षाचे नेते राहुल गांधी हे अलीकडे याच कारणामुळे विविध मंदिरांना भेटी देत असतात. मात्र एवढे करूनही २०१९च्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी काँग्रेसला आणि अन्य पक्षांना साफ झिडकारले. या पराभवामुळे हताश झालेल्या विरोधकांनी पुन्हा मतपेढीच्या




यशस्वी होणे अवघड आहे. मुस्लिमांना नागरिकत्व सुधारणा कायद्याविषयी सखोल माहिती मिळणे चालू होईल त्यावेळी मुस्लिमांच्या मनातील भीती दूर होऊ लागेल. हा कायदा शेजारील तीन राष्ट्रांमधून भारतात येऊ इच्छिणाऱ्या नागरिकांविषयी आहे, याचा आपल्याशी काहीच संबंध नाही हे सर्वसामान्य मुस्लिमांना कळू लागेल तसतशी या आंदोलनाला

राजकारणाचा आश्रय घेण्यास सुरुवात केली आहे. भारतीय जनता पक्ष वगळता अन्य सर्व पक्षांनी मुस्लिमांकडे मतपेढी या एकमेव नजरेने पहिले आहे. त्यामुळे देशातील मुस्लिमांचा खऱ्या अर्थाने विकासच होऊ शकला नाही. सध्याच्या मुस्लीम युवा पिढीला विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हायचे आहे. त्यांना आपला विकास कोण करू शकेल याचा विचार आहे. त्यांना राजकारणाशी काहीच देणेघेणे नाही. यामुळे युवा पिढी नरेंद्र मोदी यांच्या 'सबका साथ सबका विकास' या धोरणावर विश्वास ठेऊ लागली आहे. अनेक वर्षे प्रगतीपासून वंचित राहिलेल्या मुस्लीम समाजाला प्रगतीची आस लागली आहे. मोदी सरकारने २०१४ पासून राजकारण बाजूला ठेऊन मुस्लीम समाजाच्या विकासासाठी जे काही करता येणे शक्य आहे ते मोदी सरकारने गेल्या १० वर्षात केले आहे. यापुढील काळातही 'सबका साथ सबका विकास' या धोरणानुसार मुस्लीम धर्मियांच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणे आखली जात आहेत. काश्मीरचे ३७०वे कलम रद्द केल्यामुळे या राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येणे झाले आहे आणि त्याचा फायदा तेथील गोरगरीब मुस्लिमांना निश्चितच होईल. मोदी सरकारच्या 'सबका साथ सबका विकास' या धोरणावर मुस्लीम धर्मीयही विश्वास ठेऊ लागल्याने स्वतःला मुस्लिमाचे तारणहार समजणाऱ्या काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळेच या पक्षांना आपला प्रभाव वाढविण्यासाठी मतपेढीच्या राजकारणाकडे परतावे लागत आहे. मात्र त्यांचा हा प्रयत्न

पाठींबा देणाऱ्यांची संख्या कमी होऊ लागेल. शेजारील राष्ट्रातील मुस्लिमांना सुद्धा कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून भारताचे नागरिकत्व स्वीकारता येईल. जगातील कोणत्याही मुस्लिमांना भारतात ११ वर्ष वास्तव्य असल्यास भारताचे नागरिकत्व मिळविण्यासाठी पात्र समजले जाणार आहे. या कायद्यामुळे भारतीय मुस्लीम नागरिकांच्या हक्कांना कोणतीच बाधा पोचणार नाही. त्यामुळे त्यांनी या कायद्यामुळे घाबरून जाण्याचे कारण नाही. बहुसंख्य मुस्लिमांना आपला राजकारणासाठी आजवर कोणी वापर करून घेतला हे आता उमगू लागले आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारच्या कार्यकाळातच मदरशांना संगणक दिले गेले. मुस्लीम महिलांवरील अनेक वर्ष होत असलेला अन्याय मोदी सरकारने तिहेरी तलाक रद्द करून दूर केला. मुस्लीम धर्मीयांमधील उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी मोदी सरकारच्या काळात अनेक धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. या निर्णयांचे परिणाम दिसण्यास वेळ लागेल मात्र मुस्लिमांना राजकारण बाजूला ठेऊन आपल्या कल्याणासाठी मोदी सरकार वेगवेगळे निर्णय घेत आहे हे हळूहळू जाणवू लागले आहे. मुस्लीम समाजाने काश्मीरचे ३७०वे कलम रद्द करणे, तिहेरी तलाक रद्द करणे, अयोध्येतील जागा राम मंदिरासाठी देणे या सारख्या निर्णयावर अत्यंत संयमाने प्रतिक्रिया दिली आहे, हे पाहता नागरिकत्व सुधारणा कायद्यावरून मतपेढीचे राजकारण करण्याचा काही शक्तींचा प्रयत्न यशस्वी होणार नाही याची खात्री वाटते. ■

# नागरिकत्व सुधारणा कायदा हा धर्मनिरपेक्षतेशी सुसंगतच




● डॉ. राकेश सिन्हा

लोकशाही व्यवस्थेत कायदा निर्माण करण्याचे हेतू वेगवगळे असतात. कायद्याचे सामाजिक उपयोगित्व आणि जनतेच्या सामाजिक जाणीवा निरंतर ठेवणे या दोन हेतूच्या निकर्षावर तयार होणारे कायदे अत्यंत महत्वाचे असतात. या निकषावर नागरिकत्व सुधारणा कायद्याकडे पाहिले पाहिजे. हा कायदा अंमलात आल्याची घोषणा केंद्र सरकारने अलिकडेच केली आहे. हा कायदा घटनेच्या धर्मनिरपेक्षतेच्या बांधिलकीविरुद्ध आहे, असा आक्षेप काही मंडळी घेत आहेत. मात्र हा कायदा तयार करावा लागण्यामागची पार्श्वभूमी पाहिली तर हा आक्षेप पूर्णत: निराधार आहे. धर्माच्या आधारावर ज्यांचा छळ होतो त्यांना आश्रय देण्याची परंपरा भारतात शेकडो वर्षांपासून आहे.

**देशाची** राज्य घटना तयार होण्याअगोदरही भारताने अशा पद्धतीने भारतात आश्रय घेण्यासाठी आलेल्यांना आधार दिला आहे. पारसी आणि ज्यू बांधवांना धार्मिक कारणांमुळे छळाला तोंड द्यावे लागले त्यावेळी त्यांना भारतानेच उदारमनाने आधार दिला. पारसी आणि ज्यू बांधवांच्या धार्मिक हक्कांचे, स्वातंत्र्याचे भारतीयांनी प्राणपणाने रक्षण केले. १९३१ च्या जनगणनेत त्यावेळी भारतात सुमारे १ लाख १० हजार पारसी आणि २४ हजार ज्यू बांधव राहत होते, अशी नोंद सापडते. या धर्मियांना भारतात एवढा सन्मान आणि आदर मिळाला की, त्यांना भारत सोडून आपल्या मायभूमीत परतण्याची इच्छा झाली नाही. नागरिकत्व सुधारणा कायदा हा भारताच्या हजारो वर्षांपासून चालत आलेल्या उदारमतवादी मानसिकतेचे प्रतिक आहे. बांगलादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या तीन देशांमध्ये अल्पसंख्य असलेल्या हिंदू, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारसी, जैन या धर्मीयांवर होणारे अत्याचार लक्षात घेता त्यांना भारताचे नागरिकत्व देण्याची तरतूद या कायद्यामध्ये करण्यात आली आहे. काँग्रेस सत्तेत असतानाही शेजारी देशांमधील उपरोक्त धर्मियांना भारतात आश्रय दिला गेला आहे. जे पक्ष आज या कायद्याला विरोध करत आहेत त्यांनी शेजारी राष्ट्रातील अल्पसंख्यकांना आश्रय देण्याची मागणी अनेकवेळा केलेली आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे उदाहरण घ्या या पक्षाने २०१२ मध्ये बांगलादेश नागरिकांना भारताचे नागरिकत्व देण्यासाठी नागरिकत्व कायद्यात दुरुस्ती करण्याची मागणी पक्ष कार्यकारिणीच्या ठरावाद्वारे केली होती. बांगलादेश सोडून भारतात येऊ इच्छिणारे नागरिक हे तत्कालिन ऐतिहासिक स्थितीचे बळी ठरले आहेत, असे मत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने या ठरावात व्यक्त केले होते. आज हाच मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष मोदी सरकारच्या नागरिकत्व सुधारणा कायद्याला विरोध करत आहे. केवळ राजकारणासाठीच हा विरोध आहे. या तीन देशांमध्ये अल्पसंख्य असलेल्या उपरोक्त धर्मियांवर होणारा अत्याचार रोखण्यासाठी तेथील सरकार आणि समाज व्यवस्था कमी पडली आहे. महिलांना पळवून नेऊन बलात्कार करणे, त्यांना जबरदस्तीने धर्मांतर करायला लावणे यासारखे अत्याचार या तीन देशांतील धर्मांध शक्ती अनेक वर्षांपासून करत आहेत. हे अत्याचार सहन करण्याच्या स्थितीत नसलेले हिंदू, शीख, बौध्द, जैन, पारसी आणि ख्रिश्चन बांधव कोणताही पर्याय राहिला नसल्याने भारतात आश्रय घेऊ इच्छित आहेत. या नागरिकांना आश्रय देऊन त्यांना नागरिकत्व बहाल करणे हे माणुसकीच्या नात्याने आपले कर्तव्य आहे.

१९९० पूर्वी अफगाणिस्तानमध्ये हिंदू आणि शिखांची संख्या दोन लाखांपेक्षा अधिक होती. गेल्या तीन दशकात अफगाणिस्तानातील मूलतत्ववाद्यांनी केलेल्या छळामुळे हजारो हिंदू आणि शीख अफगाणिस्तान सोडून भारतात आले आहेत. अफगाणिस्तानात सध्या हिंदू आणि शिखांची संख्या शेकड्यामध्येही नाही. अफगाणिस्तानमध्ये काही वर्षापूर्वी पर्यंत ६४ मंदिरे आणि गुरुद्वारे होती. आता तेथे हाताच्या बोटावर मोजण्याइतकी मंदिरे आणि गुरुद्वारा उरली आहेत. बांगलादेशमध्येही अशीच स्थिती आहे. ढाका विद्यापीठाच्या अब्दुल बरकत यांनी केलेल्या संशोधनानुसार बांगलादेशात गेल्या ५० वर्षांपासून दररोज सरासरी ६३२ हिंदू 'गायब' होतात. बांगलादेश सरकारच्या सांख्यिकी विभागामार्फत ही आकडेवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे. १९६४ ते २०१३ या ४९ वर्षात बांगलादेशातील १ कोटीहून अधिक हिंदू नागरिक बेपत्ता झाले आहेत, असे बांगलादेश सरकारची आकडेवारी सांगते. 'गायब' झालेले हिंदू एक तर या जगातून नाहीसे केले गेले असतील किंवा त्यांचे धर्मांतर केले गेले असेल. तिसरी शक्यता म्हणजे या हिंदू नागरिकांनी बांगलादेश सोडून अन्य देशात आश्रय घेतला असावा. १९७१ मध्ये बांगलादेशची निर्मिती झाली. या देशात शत्रू संपत्ती कायदा संमत करण्यात आला आहे. या कायद्यान्वये १ कोटी ३० लाखांहून अधिक हिंदू नागरिकांच्या जमिन-जुमला, घरे, शेतीवर बळजबरीने कब्जा करण्यात आला आहे. हिंदू धर्मियांच्या ताब्यात असलेली २ लाख एकरहून अधिक शेतजमीन बळकावण्यात आली आहे. तेथील सरकार हिंदुंच्या जिवीताचे आणि मालमत्तेचे रक्षण करण्यात पूर्णपणे अयशस्वी ठरले आहे. अशा स्थितीत बांगलादेशमध्ये राहणे मुश्किल झाल्याने हिंदुंना हा देश सोडण्याशिवाय पर्याय राहिला नाही. पाकिस्तानातील हिंदू, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारसी या धर्मियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या कहाण्या अनेक दिवसांपासून आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत. पाकिस्तानातील या कहाण्या वाचल्यावर कोणताही संवेदनशील नागरिक अस्वस्थ होईल. या तीन देशातील ही भीषण परिस्थिती लक्षात घेता उपरोक्त

धर्मियांच्या रक्षणासाठी काहीतरी पाऊल टाकणे अत्यंत आवश्यक होते. त्यामुळेच नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने नागरिक सुधारणा कायद्याची निर्मिती केली. १९४७ मध्ये फाळणीला मान्यता देताना त्यावेळचे पंतप्रधान असलेल्या पं.नेहरू यांनी पाकिस्तानातील हिंदुंच्या व अन्य बिगर मुस्लीम धर्मियांच्या हिताचे रक्षण करण्यात आपले सरकार वचनबद्ध आहे, अशी ग्वाही दिली होती. भारत-पाकिस्तानमध्ये ८ फेब्रुवारी १९५० रोजी एक करार झाला. या करारान्वये दोन्ही देशाच्या सरकारांनी आपापल्या देशातील अल्पसंख्यकांचे रक्षण करण्याची हमी दिली होती. भारतातल्या आजवरच्या सरकारांनी आणि येथील समाजव्यवस्थेनेही या भूमीत वास्तव्य करणाऱ्या मुस्लीम, ख्रिश्चन या अल्पसंख्यकांना पूर्णपणे संरक्षण दिले. पं.नेहरूंनी फाळणीवेळी पाकिस्तानात गेलेल्या हिंदुंना त्यांचे रक्षण करण्याविषयी दिलेला शब्द हयात असेपर्यंत कधीच पाळला नाही. पं.नेहरू आणि त्यावेळचे पाकिस्तानचे पंतप्रधान लियाकत अली खान यांच्यात झालेल्या कराराच्या निषेधार्थ डॉ.शामाप्रसाद मुखर्जी यांनी १९ फेब्रुवारी १९५० रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. या घटनेनंतर काही दिवसांनी पाकिस्तानचे त्यावेळचे कायदा मंत्री जे.एन.मंडल यांनी पाकिस्तानात हिंदुंवर विशेषत: दलित महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. मंडल हे पाकिस्तानचे निर्माते बॅ.जिना यांचे घनिष्ट मित्र होते. पाकिस्तानच्या कायदे मंत्रिपदाचा राजीनामा देऊन मंडल थांबले नाहीत, त्यांनी भारतात परतणे पसंत केले. 'पाकिस्तानात हिंदुंवर धर्माच्या नावावर होणारे अत्याचार सहन करणे मला आता अशक्य आहे. पाकिस्तानातील हिंदुंचे जिवीत सुरक्षित नाही त्याबरोबरच त्यांची मालमत्ताही सुरक्षित राहिलेली नाही', असे मंडल यांनी लिहून ठेवले आहे. फाळणीनंतर दोन-अडीच वर्षात पाकिस्तानातील हिंदुंना जगणे मुश्किल झाले होते. गेल्या ६०-७० वर्षात ही परिस्थिती आणखी बिघडली आहे. फाळणीनंतर अवघ्या ४ महिन्यात म्हणजे ४ डिसेंबर १९४७ रोजी महात्मा गांधी यांनी पंतप्रधान नेहरू यांच्याकडे पाकिस्तानातील दलितांना भारतात परत आणण्याची मागणी केली होती. पाकिस्तानातील दलितांवर मोठे अत्याचार होत आहेत आणि त्यांच्यावर धर्मांतर करण्यासाठी जबरदस्ती केली जात आहे, असे महात्मा गांधींनी म्हटले होते. मात्र पं.नेहरूंनी महात्मा गांधींच्या या मागणीकडे लक्ष दिले नाही. फाळणीमुळे ज्यांना आपला देशच राहिला नाही अशांना आधार देण्याची जबाबदारी मोदी सरकारच्या नागरिकत्व सुधारणा कायद्यामुळे पार पाडली जात आहे. यापूर्वीही या तीन देशातील अल्पसंख्यकांना संरक्षण देण्याची भाषा बोलली गेली. मोदी सरकारने संरक्षणाची कायदेशीर शासकीय प्रक्रिया निश्चित केली.

या कायद्याविषयी ज्यांना शंका आहेत त्यांनी या शंकांचे निरसन सरकारकडून संवादाद्वारे करून घ्यायला हवे. मात्र तसे न करता या कायद्याविरुद्ध हिंसाचार करण्यासाठी काही मंडळींना प्रवृत्त केले गेले. आपले राजकीय हेतू साध्य करण्यासाठी घृणास्पद राजकारण खेळले जात आहे. हिंदू-मुस्लीम असे विभाजन घडवून आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. मानवतेच्या भूमिकेतून शेजारील राष्ट्रातील आपल्या भावंडांना आश्रय दिला तर आपल्या देशातील मुस्लीम किंवा अन्य नागरिकांवर अन्याय कसा होतो? या कायद्यानंतरही मुस्लिमांचा या देशाचे नागरिक म्हणून असलेला हक्क अबाधितच राहणार आहे. नागरिकत्वाची कल्पना ही कधीच स्थायी स्वरूपाची नसते. ही संकल्पना कालानुरूप बदलत जाते. ही संकल्पना प्रवाही आहे. भारताने प्राचीन कालापासून अनेक धर्मियांना, अनेक पंथीयांना आपल्या भूमीत, संस्कृतीत उदारपणे सामावून घेतले आहे. भारतात आलेले पारसी या देशाच्या मातीशी एकरूप झाले. त्यांना भारतात कधीच परके वाटले नाही, वाटणारही नाही. स्वातंत्र्य संग्रामात अग्रस्थानी असणाऱ्या दादाभाई नौरोजी यांनी दिनशॉ वाच्छा यांना २० डिसेंबर १८८८ रोजी पाठविलेल्या पत्रात म्हटले होते की, 'आपण भारताचे आहोत आणि भारत ही आपली मातृभूमी आहे. आपण भारतापासून बाजूला झालो तर पंख काढलेल्या मोरासारखी आपली अवस्था होईल.'

काही ऐतिहासिक पार्श्वभूमीमुळे आपल्यावर जी नैतिक जबाबदारी आलेली आहे, त्या जबाबदारीचे पालन या कायद्याद्वारे केले जात आहे. मुस्लिमांनी त्यांना भडकवणाऱ्या शक्तींपासून कायम दूर राहायला हवे. मोदी सरकार अल्पसंख्याकांच्या विरोधात नाही. त्यामुळेच भारतातील मुस्लिमांनी या कायद्याला खुलेपणाने पाठिंबा द्यायला हवा.

**(दी इंडियन एक्स्प्रेसमध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखाचा अनुवाद)**

# ३७० कलम रद्द झाल्यामुळे विकसित काश्मीर साकारते आहे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जम्मू आणि काश्मीरमध्ये श्रीनगर येथे विकसित भारत, विकसित जम्मू-काश्मीर कार्यक्रमाला संबोधित केले. त्यांनी ५००० कोटी रुपये खर्चाच्या समग्र कृषी विकास कार्यक्रमाचे राष्ट्रार्पण केले आणि स्वदेश दर्शन आणि प्रसाद योजनांतर्गत पर्यटनाशी संबंधित १४०० कोटी रुपयांहून जास्त खर्चाच्या विविध प्रकल्पांचा शुभारंभ केला. यामध्ये श्रीनगर येथील हझरतबाल दर्ग्याच्या एकात्मिक विकासाचा देखील समावेश आहे.

**पंतप्रधानांनी** 'देखो अपना देश पीपल्स चॉईस २०२४' आणि ' चलो इंडिया ग्लोबल डायस्पोरा कॅम्पेन' चा शुभारंभ केला आणि आव्हानात्मक स्थळांच्या विकासांतर्गत निवडलेल्या पर्यटन स्थळांची घोषणा केली. जम्मू आणि काश्मीरमध्ये सरकारी नोकऱ्यांमध्ये निवड झालेल्या १००० नवनियुक्तांना नियुक्ती आदेश वितरित केले आणि कर्तबगार महिला, लखपती दीदी, शेतकरी, उद्योजक इ. सह विविध सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांसोबतही संवाद साधला.

पृथ्वीवरील स्वर्गात येण्याचा आनंद शब्दांत वर्णन करता येणार नाही असे सांगून अद्वितीय असा निसर्ग, हवा, खोरे, पर्यावरण आणि त्याला कश्मिरी बंधुभगिनींच्या प्रेमाची जोड इथे मिळाली असल्याचे पंतप्रधान म्हणाले. या कार्यक्रमाला २८५ विभागांमधून दूरदृश्य माध्यमातून एक लाखापेक्षा अधिक लोक उपस्थित असल्याची दखल त्यांनी घेतली. दशकानुदशके प्रतीक्षेत राहिलेला,



डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी ज्यासाठी त्याग केला तो नवा जम्मू-कश्मीर साकारल्याचे पंतप्रधान म्हणाले. इथल्या जनतेच्या चेहऱ्यावरील हास्य पाहून १४० कोटी नागरिकांना शांत वाटत असल्याचे त्यांनी सांगितले.

जम्मू आणि काश्मीरच्या जनतेच्या प्रेमाप्रति कृतज्ञता व्यक्त करताना पंतप्रधान म्हणाले, या प्रेमाची परतफेड करण्यामध्ये मोदी कोणतीही कसर बाकी ठेवणार नाहीत. तुमची मने जिंकण्यासाठी मी हे परिश्रम करत आहे आणि मी योग्य मार्गावर चालत असल्याची माझी खात्री आहे. तुमची मने जिंकण्याचे प्रयत्न मी सुरूच ठेवेन. ही मोदींची गॅरंटी आहे. आणि तुम्हा सर्वांना माहीतच आहे की मोदींची गॅरंटी म्हणजे आश्वासनांच्या पूर्ततेची हमी.

आपल्या जम्मू दौऱ्याचा उल्लेख करून पंतप्रधानांनी ३२,००० कोटी रुपयांचे पायाभूत सुविधा आणि शिक्षणविषयक प्रकल्प सुरू केल्याचे सांगितले. आजचे प्रकल्प पर्यटन विकास, शेतीविषयक प्रकल्पांशी निगडित होते तसेच उमेदवारांना नियुक्ती पत्रे देखील वितरित केल्याचे ते म्हणाले. विकास, पर्यटनाच्या क्षमता, शेतकऱ्यांच्या क्षमता आणि युवांची नेतृत्वक्षमता विकसित जम्मू कश्मिरचा मार्ग सुकर करेल. जम्मू कश्मिर हा देशाचा निव्वळ एक भाग नसून देशाचे हे मस्तक आहे, ते उंचावलेले असणे हे विकास आणि आदराचे चिन्ह आहे,



त्यामुळे विकसित जम्मू कश्मिर हा विकसित भारताच्या प्राधान्यक्रमावर आहे.

देशातील कायदे जम्मू-कश्मिरसाठी असलेल्या कायद्यांपेक्षा वेगळे असलेल्या काळाची आठवण करून देत पंतप्रधानांनी त्या काळात वंचितांपर्यंत कल्याणकारी योजना पोहोचत नव्हत्या. वर्तमानात मात्र श्रीनगर आणि जम्मू कश्मिरमधून देशातील पर्यटनविकासाच्या योजनांची सुरुवात होत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. देशातील ५० पेक्षा जास्त ठिकाणांहून लोक कार्यक्रमात सहभागी झाल्याचे त्यांनी सांगितले. स्वदेश दर्शन योजनेचा भाग म्हणून सहा प्रकल्पांचे लोकार्पण झाल्याचे ते म्हणाले. देशातील शहरांसाठी सुमारे ३० प्रकल्पांची सुरुवात झाली असून श्रीनगरसाठी तीन प्रकल्प आहेत आणि प्रसाद योजनेअंतर्गत अन्य १४ प्रकल्पांना सुरुवात झाल्याचे त्यांनी सांगितले. पवित्र हजरतबल दर्ग्यात लोकांच्या सोयीसुविधेसाठी हाती घेतलेली विकासकामे पूर्ण झाल्याचे ते म्हणाले. 'देखो अपना देश पीपल्स चॉईस' अभियानासाठी सरकारने येत्या दोन वर्षांमध्ये पर्यटन स्थळे म्हणून विकसित करण्यासाठी ४० ठिकाणांची निवड केल्याची माहिती पंतप्रधानांनी दिली. अभियानांतर्गत जनतेचा कौल लक्षात घेऊन सर्वाधिक पसंतीच्या पर्यटनस्थळांचा विकास करणार असल्याचे ते म्हणाले. परदेशस्थ भारतीय नागरिकांना भारतात येण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरता असलेल्या 'चलो इंडिया' अभियानाचा त्यांनी उल्लेख केला.

जम्मू कश्मिरमध्ये सुरू झालेल्या विकासकामांबद्दल पंतप्रधानांनी तिथल्या जनतेचे अभिनंदन केले. या प्रकल्पांमुळे पर्यटन उद्योगाच्या विकासामार्फत प्रदेशाचा विकास आणि रोजगाराच्या नव्या संधींची निर्मिती शक्य होईल. हेतू महान आणि ध्येयपूर्तीची जिद्द असते तेव्हा ते निकालामध्ये प्रतिबिंबित होते, असे म्हणून पंतप्रधानांनी जी२० शिखर परिषदेचे यजमानपद जम्मू-कश्मिरने यशस्वीरित्या सांभाळल्याचा उल्लेख केला.

आमूलाग्र बदल घडवणारी वाढ पर्यटनात झाल्याचे सांगून पंतप्रधान म्हणाले, एक काळ होता जेव्हा लोकांना प्रश्न पडत असे की जम्मू कश्मिरला पर्यटनासाठी जाणार कोण; आज जम्मू कश्मिरने पर्यटनाचे सर्व विक्रम मोडले आहेत. फक्त २०२३ या वर्षात जम्मू कश्मिरमध्ये दोन कोटींपेक्षा जास्त, विक्रमी संख्येने पर्यटक आले. गेल्या दहा वर्षांत अमरनाथ यात्रेकरूंची संख्या सर्वोच्च ठरली आहे; तर वैष्णोदेवीला जाणाऱ्यांच्या संख्येतही लक्षणीय वाढ झाली आहे. परदेशी पर्यटकांचे प्रमाणही वाढले असून आंतरराष्ट्रीय पाहुणे, चंदेरी दुनियेतील व्यक्तींसाठीही जम्मू-कश्मीर आकर्षण ठरत असल्याचे सांगून पंतप्रधान म्हणाले, ही मंडळी जम्मू कश्मिरला भेट देतात, विडिओ आणि रील्स तयार करतात.

कृषी क्षेत्राकडे रोख वळवत पंतप्रधान मोदी यांनी जम्मू-काश्मीरमधील केशर, सफरचंदे, सुकवलेली फळे आणि चेरी अशा कृषी उत्पादनांच्या सामर्थ्यावर अधिक भर देऊन या भागाचे महत्त्वाचे कृषी केंद्र म्हणून ब्रँडिंग करण्यावर भर दिला. ते म्हणाले की ५,००० कोटी रुपयांचा कृषी विकास कार्यक्रम येत्या ५ वर्षांच्या काळात जम्मू- काश्मीरमधील कृषी क्षेत्राचा, विशेषतः फलोत्पादन आणि पशुधन विकास क्षेत्राचा अभूतपूर्व विकास घडवून आणेल. हा उपक्रम फलोत्पादन आणि पशुपालन या क्षेत्रांमध्ये हजारो नव्या संधी निर्माण करेल.

याखेरीज, जम्मू आणि काश्मीरमधील शेतकऱ्यांना पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेच्या माध्यमातून








पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कार्यक्रमात सरकारी योजनांच्या अनेक लाभार्थ्यांशी संवाद साधला.





सुमारे ३,००० कोटी रुपयांचे थेट लाभ हस्तांतरण झाले आहे याचा उल्लेख त्यांनी केला. फळे तसेच भाजीपाला यांची साठवण क्षमता सुधारणे तसेच त्यांचे अधिक काळ जतन होईल याची सुनिश्चिती करणे या उद्देशाने जम्मू आणि काश्मीरमधील साठवण सुविधा वाढवण्यासाठी लक्षणीय प्रमाणात गुंतवणूक करण्यात आली आहे अशी माहिती त्यांनी दिली. 'जगातील सर्वात मोठ्या गोदामांच्या उभारणी योजने'ची सुरुवात झाल्यावर त्यातून जम्मू आणि काश्मीरमध्ये अनेक गोदामे बांधण्यात येतील याकडे देखील पंतप्रधानांनी सर्वांचे लक्ष वेधले. जम्मू आणि काश्मीरमधील विकासाची जलदगती लक्षात घेत पंतप्रधानांनी सांगितले की या भागात २ एम्स उभारले जात आहेत याचा उल्लेख केला, यापैकी एम्स जम्मूचे उद्घाटन यापूर्वीच झाले असून एम्स काश्मीर या संस्थेच्या उभारणीचे कार्य प्रगतीपथावर आहे अशी माहिती त्यांनी दिली. या भागात सुरु करण्यात आलेली ७ नवी वैद्यकीय महाविद्यालये, २ कर्करोग रुग्णालये तसेच आयआयटी आणि आयआयएम यांसारख्या संस्थांचा देखील त्यांनी उल्लेख केला. जम्मू आणि काश्मीरमध्ये २ वंदे भारत गाड्यांची सेवा सुरु झाली असून श्रीनगर ते संगल्दन आणि संगल्दन ते बारामुला या मार्गावर या गाड्या धावत आहेत अशी माहिती त्यांनी दिली. संपर्क सुविधेच्या या विस्ताराने या भागातील आर्थिक व्यवहारांना चालना दिली आहे. जम्मू आणि श्रीनगर या शहरांना स्मार्ट शहरे बनवण्यासाठीच्या नव्या प्रकल्पांचा संदर्भ देत पंतप्रधान मोदी म्हणाले, येत्या काळात, जम्मू आणि काश्मीरची यशोगाथा संपूर्ण देशासाठी एक आदर्श उदाहरण ठरेल. ■

# जम्मू-काश्मीरच्या लाभार्थ्यांशी पंतप्रधान मोदी यांनी साधला संवाद

**पुलवामा** येथील नझीम नझीर या मधुमक्षिकापालकाने कशा प्रकारे सरकारी योजनांचा लाभ घेऊन आपण प्रगती केली त्याची माहिती पंतप्रधानांना दिली. ५० टक्के अनुदानाने या मधुमक्षिकापालकाने २५ पेट्या खरेदी केल्या आणि आपल्या व्यवसायाचा विस्तार केला असे सांगितले. पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत नझीर यांनी ५ लाख रुपयांचे कर्ज घेऊन मधुमक्षिकापालनासाठी हळूहळू आपल्या व्यवसायाची व्याप्ती २०० पेट्यांपर्यंत वाढवली. त्यांनी आपला स्वतःचा एक ब्रँड निर्माण केला आणि एक वेबसाईट तयार केली. ज्यामुळे त्यांना देशभरातून त्यांच्या मधासाठी सुमारे ५००० किलोच्या हजारो मागण्या आल्या. त्यामुळे त्यांचा व्यवसाय २००० मधुमक्षिका पेट्यांपर्यंत वाढला आणि त्यांनी या भागातील १०० युवांना देखील रोजगार दिला. २०२३ मध्ये एफपीओ मिळाल्याची आणि त्यामुळे व्यवसायाला आणखी जास्त फायदा झाल्याची माहिती देखील त्यांनी पंतप्रधानांना दिली. देशातील फिनटेक परिदृश्याचा कायापालट करणारा डिजिटल इंडिया उपक्रम सुरू केल्याबद्दलही त्यांनी पंतप्रधानांचे आभार मानले. पंतप्रधानांनी नझीम यांनी केलेल्या परिश्रमांची आणि जम्मू आणि काश्मीरमध्ये मधुर क्रांतीचे नेतृत्व करत असल्याबद्दल प्रशंसा केली आणि त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन केले. यावेळी पंतप्रधानांनी त्यांचा व्यवसाय सुरू करण्यासाठी सरकारकडून दिल्या जाणाऱ्या प्रारंभिक पाठबळाविषयी त्यांच्याकडे विचारणा केली.

● श्रीनगरमध्ये बेकरी उद्योजक असलेल्या एहतेशाम माजीद भट या महिलेने अन्न तंत्रज्ञान कौशल्य विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून बेकरीमध्ये नाविन्यपूर्ण संशोधन आणले आहे. त्यांना सरकारच्या महिला कौशल्य विकास तंत्रनिकेतनातील इनक्युबेशन सेंटरकडून पाठबळ मिळाले. सरकारच्या एक खिडकी योजनेची त्यांना आणि त्यांच्या टीमला विविध विभागातून सर्व एनओसी मिळवण्यात मदत मिळाली. गेल्या १० वर्षात सरकार कोट्यवधी युवांना



मधमाशा पालनाचा व्यवसाय करणारा नझीम नझीर.


त्यांची स्वप्ने साकार करण्यासाठी संपूर्ण पाठबळ देत असल्याचे पंतप्रधानांनी त्यांना सांगितले. आपल्या उद्यमशीलतेच्या उपक्रमामध्ये विविध जिल्ह्यात राहणाऱ्या आपल्या मैत्रिणींना देखील यामध्ये सहभागी करून घेतल्याबद्दल पंतप्रधानांनी एहतेशाम यांची प्रशंसा केली. युवा वर्गाच्या संकल्पना आणि स्वप्नांच्या पूर्ततेमध्ये संसाधने आणि अर्थसाहाय्य यांच्या कमतरतेचा अडसर येऊ नये. त्यांनी आत्मविश्वासाने वाटचाल करावी, हाच आमचा प्रयत्न आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

● गांदरबल इथली हमिदा बानू दुग्ध उत्पादने व्यवसायात आहे. नॅशनल रूरल लाइवलीहूड मिशन अर्थात राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानाचा लाभ घेत दूध उत्पादनांच्या निर्मितीचा व्यवसाय सुरू केल्याचे तिने पंतप्रधानांना सांगितले. इतर महिलांना रोजगार देणे शक्य झाल्याचे सांगून उत्पादनाचा दर्जा राखणे, वेष्टन बांधणी आणि जाहिरातीसाठी केलेल्या योजनांचीही तिने यावेळी माहिती दिली. दूध उत्पादनांमध्ये संरक्षके घालत नसल्याचेही तिने स्पष्ट केले. पोषणासाठी योग्य उत्पादनाच्या निर्मितीत उतरल्याबद्दल आणि दर्जा राखून व्यवसाय करत असल्याबद्दल पंतप्रधानांनी तिचे कौतुक केले. ■

# झूठ बोले काँग्रेस कांटे

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय रस्ते बांधणी मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या विधानाचा विर्पयास करणारा व्हिडिओ प्रसिद्ध केल्याबद्दल काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि जयराम रमेश यांना नोटीस पाठविली आहे. श्री. गडकरी यांनी एका वेब पोर्टलला दिलेल्या मुलाखतीतील निवडक भाग संदर्भहीन पद्धतीने संपादित करून त्याचा व्हीडिओ श्री. खर्गे आणि जयराम रमेश यांनी समाजमाध्यमावरून प्रसारीत केला. हा धडधडीत खोटेपणा करण्याचे धारिष्ट्य श्री. खर्गे यांनी दाखवले याचे कारण मोठ्या पराभवाच्या शक्यतेने येऊ लागलेले वैफल्य.

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पार्टी यांच्याविरूद्ध सातत्याने अपप्रचार करूनही आगामी लोकसभा निवडणुकीत मतदार सलग तिसऱ्यांदा भारतीय जनता पार्टीच्या गळ्यात विजयाची माळ घालणार, हे स्पष्ट होऊ लागल्याने काँग्रेसजनांची चिडचिड होणे स्वाभाविक आहे. सलग १५ वर्षे केंद्रातील सत्तेविना राहण्याची कल्पनाच काँग्रेसजनांना सहन होईनाशी झाली आहे. त्यातून आलेल्या वैफल्यामुळेच खर्गे यांचा सारखा ज्येष्ठ आणि जाणता राजकारणी अशा पद्धतीने खोटेपणाच्या सीमाही पार करू लागला आहे. खर्गे आणि जयराम रमेश यांनी समाजमाध्यमांवर प्रसारीत केलेल्या व्हिडिओमध्ये श्री. गडकरी हे ग्रामीण भागातील स्थितीविषयी बोलताना दिसत आहेत. 'द ललन टॉप' या वेब पोर्टलवरील श्री. गडकरी यांची संपूर्ण मुलाखत पाहिल्यावर खर्गे आणि




जयराम रमेश यांची बदमाशी कळून येते.

मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर गेल्या १० वर्षात काँग्रेस नेत्यांनी अशा खोटेपणाचा आश्रय अनेकदा घेतला. हा खोटेपणा उघड झाल्यावर त्याबद्दल माफी मागून काँग्रेस नेत्यांनी आपली सुटका करून घेतली आहे. काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांना अशा खोटेपणाबद्दल तीनवेळा माफी मागण्याची नामुष्की सहन करावी लागली आहे. यापैकी एका घटनेत राहुल गांधी यांना सर्वोच्च न्यायालयाची माफी मागावी लागली होती. यातून काँग्रेस नेते गेंड्यापेक्षाही निबर कातडीचे आहे, हेच सिद्ध झाले. माजी संरक्षणमंत्री तथा गोव्याचे मुख्यमंत्री मनोहरजी पर्रीकर हे शेवटच्या घटका मोजत मृत्यूशी झुंज देत असताना त्यांची विचारपूस करण्यासाठी गेलेले राहुल गांधी हे महाशय बाहेर येऊन म्हणाले, ''राफेल कराराला माझी मान्यता नव्हती, असे मनोहरजी पर्रीकरांनी मला सांगितले.'' पर्रीकरांनी खरमरीत शब्दांत युवराजांची कानउघाडणी केल्यावर आणि आपला खोटेपणा बाहेर पडल्यानंतर राहुल गांधींनी पर्रीकरांची लगेचच माफीही मागितली.

राफेल विमान खरेदीला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या. या याचिकांच्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने काही कागदपत्रासंदर्भात केंद्र सरकारने केलेली विनंती अमान्य केली होती. त्याचा आधार घेत राहुलबाबांनी 'चौकीदार चोर है' या घोषणेवर सर्वोच्च न्यायालयानेही शिक्कामोर्तब केले आहे, असे विधान केले होते. त्याविरोधात सर्वोच्च





न्यायालयात दाद मागण्यात आली. तेव्हा कुठे राहुलबाबांना आपण काय म्हणालो होतो हे कळले. त्यांच्या विधानाचे काय गंभीर परिणाम होणार आहेत, हे समजावून सांगितल्यावर राहुलबाबांच्या डोक्यात प्रकाश पडला आणि त्यांनी सर्वोच्च न्यायालयासमोर लोटांगण घालत माफी मागितली. आपली घोडचूक मान्य केली. २०१८ च्या मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात त्यावेळी काँग्रेस अध्यक्ष असलेल्या राहुल गांधी यांनी मध्य प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांचे पुत्र कार्तिकेय सिंह यांचा पनामा पेपर घोटाळ्यात उल्लेख होता, असा आरोप केला होता. कार्तिकेय सिंह चौहान यांनी राहुल गांधी यांना तातडीने मानहानीची कागदेशीर नोटीस बजावली. त्यावरून न्यायालयात खटलाही दाखल झाला. या खटल्याच्या सुनावणीत राहुल गांधी यांनी आपण कार्तिकेय सिंह चौहान यांच्यावर गैरसमजातून आरोप केल्याचे मान्य करत त्याबद्दल कार्तिकेय चौहान यांची माफीही मागून टाकली.

अपप्रचाराचे आणि जनतेच्या दिशाभूलीचे अनेक प्रयत्न करूनही मतदार आपल्याला थारा न देता नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पार्टीवरच विश्वास ठेवतात, हे कळून चुकल्याने काँग्रेससह सर्वच विरोधी पक्ष सैरभैर झाले आहेत. मोदी सरकारच्या लोककल्याणकारी योजनांना आणि गरीब कल्याणाच्या कार्यक्रमाला विरोध करता येत नाही, अशा स्थितीत मोदी आणि भारतीय



**देशातील सर्वाधिक भ्रष्ट व्यक्तींच्या यादीत भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचेही नाव असल्याचे अरविंद केजरीवाल म्हणाले होते. श्री. गडकरी यांनी त्यांच्याविरोधात दिल्लीतील एका न्यायालयात मानहानीचा खटला दाखल केल्यावर केजरीवाल यांनी चक्क माफी मागितली.**

जनता पार्टीला विरोध तरी कोणत्या मुद्यावर करायचा, हेच कळनासे झाल्याने अगतिक, हतबल विरोधक अशा पद्धतीने व्हिडिओशी छेडछाड करून नरेंद्र मोदी आणि भाजपाच्या बदनामीचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत.

नितिमत्तेचे राजकारण करण्याची भाषा करणाऱ्या दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनाही अलिकडेच खोटा व्हीडिओ समाजमाध्यमांवरून प्रसारीत केल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयात माफी मागावी लागली आहे. ध्रूव राठी याचा एक व्हिडिओ अरविंद केजरीवाल यांनी प्रसारीत केला. त्या विरोधात दाद मागितली गेल्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले. सर्वोच्च न्यायालयात केजरीवालांनी लोटांगण घालत माफी मागितली. केजरीवाल यांना भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची काही वर्षापूर्वी माफी मागावी लागली होती. त्यातूनही धडा न शिकलेल्या केजरीवाल यांनी भारतीय जनता पार्टीच्या आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बदनामीसाठी ध्रूव राठीचा एक व्हिडिओ शहानिशा न करता समाजमाध्यमांवर प्रसारीत केला.

न्यायालयाच्या थपडा खाऊनही राहुल गांधी, केजरीवाल यांच्यासारखे विरोधी नेते आपले 'असत्याचे प्रयोग' थांबवण्यास तयार नाहीत. लोकसभा निवडणुकीत अपेक्षेप्रमाणे मतदारांचा दणका बसल्यावर ही मंडळी थोडेफार शहाणपण शिकतील, अशी आशा करण्यास हरकत नाही. ■

# प्रातिनिधिक लोकशाही लोकप्रिय! मोदींना तिस-यांदा पसंती !!

● प्रा. नंदकुमार काकिर्डे

जागतिक पातळीवर सर्वत्र लोकशाहीचे नेहमीच गुणगान केले जाते. ही लोकशाही कोणत्या पद्धतीची असावी याबाबत जागतिक कल लक्षात घेतला तर प्रातिनिधिक लोकशाही जगभर लोकप्रिय आहे. तरीही या लोकशाहीच्या कार्यपद्धतीबाबत सर्वत्र टीकेचा सूर दिसतो. भारतात येऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेतील प्यू रिसर्च सेंटरने (Pew Research Centre) प्रसिद्ध केलेल्या दोन वेगळ्या पाहणी अहवालांचा घेतलेला हा आढावा.



**अमेरिकेतील** वॉशिंग्टन डीसी येथील प्यू संशोधन केंद्र २००८ पासून विविध क्षेत्रात संशोधन करणारे अग्रगण्य केंद्र आहे. मायकेल डिमॉक हे त्याचे प्रमुख असून त्यांच्याकडे १६० कर्मचाऱ्यांचे अकरा संशोधन गट आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये जगभरातील लोकशाहींचे एकूण आरोग्य बिघडत चालले असल्याचा निष्कर्ष त्यांनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या स्प्रिंग २०२३ ग्लोबल टिट्यूडस् सर्व्हेमध्ये काढला आहे. त्याचवेळी त्यांनी भारतात होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये काय घडू शकेल याबाबतचाही स्वतंत्र पहाणी अहवाल प्रसिद्ध केला आहे.

संपूर्ण जगाचा विचार करता बहुतेक सर्व नागरिकांमध्ये प्रातिनिधिक लोकशाही ही जास्त लोकप्रिय आहे असे आढळून आलेले आहे. जगभरातील एकूण २४ देशांमध्ये या संस्थेने २०२३ मध्ये एक पाहणी केली. या सर्व देशांमध्ये खऱ्या अर्थाने अत्यंत तगडी, बळकट लोकशाही अस्तित्वात आहे. या देशांमध्ये लोकशाही राज्यपद्धती असून जनतेच्या माध्यमातून निवडून गेलेले प्रतिनिधी देशाचा कायदा काय असावा हे ठरवत असून देश चालवण्यासाठी ही चांगली व परिणामकारक पद्धती आहे असे सर्वसाधारण लोकांना वाटते.

मात्र गेल्या पाच–सहा वर्षात जागतिक पातळीवरील प्रातिनिधिक लोकशाही बाबतचा उत्साह हळूहळू सर्वत्र कमी होताना दिसत असून त्यात अत्यंत महत्त्वाचा बदल जाणवत आहे. पाहणी केलेल्या नागरिकांपैकी साधारणपणे ५९ टक्के जणांनी त्यांच्या देशातील लोकशाही ज्या पद्धतीने कामकाज करीत आहे त्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्याचप्रमाणे ७४ टक्के लोकांना असे वाटते की निवडून गेलेले प्रतिनिधी, जनतेला त्यांच्याबाबत काय वाटते याला अजिबात किंमत देत नाहीत. एवढेच नाही तर ४२ टक्के जनतेला असे वाटते की त्यांच्या देशातील एकही

राजकीय पक्ष त्यांच्या मताचे किंवा दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व सरकारमध्ये करत नाही. जगभरातील २४ देशांमध्ये ३० हजार ८६१ मतदारांची या संशोधन केंद्राने फेब्रुवारी ते मे २०२३ दरम्यान प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचा कल जाणून घेतला. जगभरामध्ये विविध देशांमध्ये कोणत्या प्रकारचे सरकार किंवा सत्ताधारी असावे याची चाचपणी केली असता बहुसंख्य लोकांना असे वाटते की लोकशाही पद्धतीने निवडून गेलेले सत्ताधारी हे जास्त चांगल्या पद्धतीने लोकशाही राबवू शकतात. मात्र काही देशांमध्ये तज्ञांचे सल्ले घेऊन त्यांच्या माध्यमातून देशाचे नियमन करण्याला अनेक देशांमध्ये पाठिंबा वाढताना दिसत आहे.

### भारतातील पाहणीचे वेगळे निष्कर्ष !

भारतात याबाबत केलेल्या पाहणीची आकडेवारी लक्षात घेता भारतामध्ये १८ टक्के लोकांना सध्याची लोकशाही किंवा एकूणच प्रातिनिधिक लोकशाही जास्त वाईट आहे असे वाटते. मात्र ४३ टक्के लोकांना अशी लोकशाही बऱ्यापैकी काम करीत आहे असे वाटते तर उर्वरित ३६ टक्के लोकांना सध्याची देशातील लोकशाही चांगल्या रीतीने कामकाज करत आहे वाटते. भारतात पाहणी केलेल्या मतदारांपैकी ७२ टक्के लोकांना असे वाटते की भारतात लष्कराची राजवट किंवा सत्ता असावी. एखाद्या हुकूमशाही मार्गाने जाणाऱ्या नेत्याकडे देशाची सूत्रे असली तर देशाच्या विकासासाठी ते चांगले आहे असे ६७ टक्के लोकांना वाटते. एका अर्थाने लोकशाही बाह्य तज्ञ लोकांकडून देशाचा कारभार चालवला जावा असे वाटणाऱ्यांची संख्या भारतात वाढताना दिसत आहे. भारतात जर महिला प्रतिनिधी मोठ्या प्रमाणावर निवडून आल्या तर देशाची धोरणे चांगल्या रीतीने बदलली जातील असे मत ६८ टक्के लोकांनी व्यक्त केले आहे. ज्या नागरिकांचे उत्पन्न खूप कमी आहे त्यांना नेहमीच एका सशक्त नेत्याची गरज असते. त्याच्या हातात सत्ता एकवटली जात असली तरी त्यांना त्याचे काही वाटत नाही. भारतात अशाच मंडळींनी व कमी शिकलेल्या लोकांनी हुकूमशाहीला जास्त प्राधान्य दिल्याचे या पाहणीत आढळले.

### नरेंद्र मोदींनाच तिसऱ्यांदा पसंती!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला भारतातील जनता तिसऱ्या खेपेसही अनुकूल असल्याचा निष्कर्ष या संशोधन केंद्राने त्यांच्या ताज्या पहाणी अहवालात प्रसिद्ध केला आहे. त्यांनी पाहणी केलेल्या एकूण मतदारांपैकी प्रत्येकी १० पैकी आठ जणांनी म्हणजे जवळजवळ ७९ टक्के मतदारांनी मोदींना तिसऱ्या वेळेस पंतप्रधान होण्यासाठी पसंती दिलेली आहे. पाहणी केलेल्यातील ५५ टक्के भारतीयांनी नरेंद्र मोदी हेच तिसऱ्या वेळेस पंतप्रधान व्हावेत अशी खूप सबळ इच्छा व्यक्त केली आहे. मात्र पाच पैकी एका भारतीयाने त्यांच्या विरोधात मत प्रदर्शन केले आहे. या अहवालात असे मत व्यक्त करण्यात आले आहे की जागतिक पातळीवर भारताच्या पाहण्याच्या दृष्टिकोनातून चांगल्या प्रकारे, सकारात्मक अशी वाढ होत आहे. एकूण मतप्रदर्शन करणाऱ्या व्यक्तींपैकी ५० टक्क्यांपेक्षा पेक्षा कमी लोकांनी भारताची अवस्था दुबळी होत असल्याचे मत व्यक्त केले आहे. राजकीय पक्षांबाबत बोलायचे झाले तर भारतीय जनता पक्षाला ७३ टक्के तर काँग्रेसला ६० टक्के मतदारांचा पाठिंबा असल्याचे दिसले. त्याचवेळी इपसॉस इंडिया बस यांनी केलेल्या दुसऱ्या स्वतंत्र पाहणीनुसार नरेंद्र मोदींना ७५ टक्के पेक्षा जास्त लोकांनी पंतप्रधानपदासाठी तिसऱ्यांदा पसंती दिलेली आहे. गेल्या काही महिन्यात मोदींच्या बाबतचा कल सतत वाढताना दिसत असल्याचे या अहवालात म्हटले आहे. देशाच्या विविध विभागांचा विचार करता उत्तर प्रदेशातून ९२ टक्के पाठिंबा आढळला असून पूर्व मधून ८४ टक्के तर पश्चिम प्रदेशातून ८० टक्के प्रतिसाद लाभत आहे. या तुलनेमध्ये दक्षिण भारतातून नरेंद्र मोदी यांना जेमतेम पस्तीस टक्के पाठिंबा लाभला आहे.

तसेच देशातील मतदारांच्या वयोगटाचा विचार करता ४५ वर्षे वयापेक्षा जास्त असलेल्या लोकांकडून ७९ टक्के मतदान मोदींच्या बाजूने झाल्याचे या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. या अहवालात मोदी सरकारचे कोणत्या क्षेत्रातील काम समाधानकारक झाले आहे याबाबतच्या आढावा घेतला असता शिक्षण क्षेत्रात ७६ टके; स्वच्छता साफसफाई क्षेत्रात ६७ टक्के व आरोग्य सेवा क्षेत्रात ६४ टक्के चांगले काम झालेले आहे. महागाई नियंत्रणासाठी ४४ टक्के गुण देण्यात आले आहेत. राम मंदिराचे पुनर्निर्माण व जी-ट्वेंटी परिषदेचे भारतातील उत्तम आयोजन व या परिषदेचे लाभलेले अध्यक्षपद या गोष्टींमुळे मोदींची जगभरात तसेच भारतातही लोकप्रियता वाढली असल्याचे मत या पहाणी अहवालात व्यक्त करण्यात आले आहे. ■

# मोदी सरकारच्या 10 लोकप्रिय योजना कोणत्या?

## कोणाला मिळतो या योजनांचा लाभ

केंद्र सरकार देशातील सामान्य जनतेला आर्थिक पाठबळ देण्यासाठी विविध योजना राबवत आहे. या योजनांचा करोडो लोकांना मोठा फायदा होत आहे. आपण मोदी सरकारच्या सर्वात लोकप्रिय असलेल्या १० योजनांबद्दल सविस्तर माहिती पाहणार आहोत. या योजनांचा नेमका किती फायदा होत आहे. याचा लाभ कसा घ्यावा याबाबतची माहिती पाहुयात.

### पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजना ही अत्यंत लोकप्रिय झालेली योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ देण्याचा प्रयत्न केला जातोय. या योजनेअंतर्गत केंद्र सरकार देशातील शेतकऱ्यांना एका वर्षात ६००० रुपयांची आर्थिक मदत करते. प्रत्येकी २,००० रुपयांच्या तीन हप्त्यांमध्ये हे पैसे थेट शेतकरी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात हस्तांतरित केले जातात. या योजनेत जमीन, उत्पन्नाचे स्रोत आणि इतर काही बाबी लक्षात घेऊन लाभार्थ्यांची पात्रता ठरवली जाते. आत्तापर्यंत या योजनेचे १६ हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले आहेत.

### प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना

मोदी सरकारने मार्च २०२० मध्ये प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना सुरू केली. कोरोना महामारीमुळे लॉकडाऊन दरम्यान ही योजना सुरू करण्यात आली. ८० कोटी लोकांना मोफत अन्नधान्य देण्यात आले. केंद्र सरकारने या योजनेला अनेकवेळा मुदतवाढ दिली आहे. सध्या या योजनेचा लाभ डिसेंबर २०२३ पर्यंत मिळू शकतो. पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेच्या माध्यमातून देशातील ८० कोटी नागरिकांना दरमहा ५ किलो गहू किंवा तांदूळ मोफत दिला जातो.

### उज्ज्वला योजना

देशातील महिलांचे जीवन बदलण्याच्या उद्देशाने मोदी सरकारने मे २०१६ मध्ये उज्ज्वला योजना सुरू केली. या योजनेंतर्गत बीपीएल कार्डधारकांना मोफत गॅस कनेक्शन दिले जाते. तसेच वर्षभरात १२ गॅस सिलेंडरवर अनुदान दिले जाते. अनुदान थेट पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते. १ मार्च २०२३ पर्यंत उज्ज्वला योजनेचे ९.५९ कोटी लाभार्थी आहेत. केंद्र सरकारनं त्याच्या विस्तारासाठी एक योजना देखील जाहीर केली आहे. ज्या अंतर्गत २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन वर्षांत १६५० कोटी रुपये खर्चून ७५ लाख नवीन उज्ज्वला एलपीजी कनेक्शन जारी केले जातील.

### विश्वकर्मा योजना

विश्वकर्मा योजनेंतर्गत १३००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जी पुढील ५ वर्षांसाठी म्हणजे २०२३-२०२४ ते २०२७-२०२८ पर्यंत लागू असणार आहे. प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेअंतर्गत पारंपारिक कारागीर आणि हस्तकलाकारांना विश्वकर्मा प्रमाणपत्र आणि ओळखपत्र मिळणार आहे. तसेच पहिल्या टप्प्यात १ लाख रुपयांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज ५ टक्के

सवलतीच्या व्याजदराने उपलब्ध होईल. यासाठी कोणत्याही हमीभावाची गरज भासणार नाही.

### प्रधानमंत्री आवास योजना

या योजनेअंतर्गत देशातील गरीब आणि बेघर लोकांना त्यांचे घर बांधण्यासाठी केंद्र सरकारकडून मदत दिली जाते. या रकमेच्या मदतीने दारिद्र्यरेषेखालील नागरिकांना स्वत:चे घर बांधता येणार आहे. पीएम आवास योजनेचे दोन प्रकार आहेत, पहिले पीएम आवास ग्रामीण आणि दुसरे पीएम आवास अर्बन जे शहरी भागांसाठी आहे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून सरकार ग्रामीण भागातील लोकांना १,३०,००० रुपये आणि शहरी भागातील लोकांना घरे बांधण्यासाठी १,२०,००० रुपये देते. बहुतेक राज्य सरकारे देखील या रकमेत योगदान देतात, ज्यामुळे ती २.५ लाख रुपयांपर्यंतची आर्थिक मदत होते. केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार, संपूर्ण देशात आतापर्यंत ४ कोटींहून अधिक लोकांना या योजनेअंतर्गत घरे देण्यात आली आहेत.

### प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना

प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना ही मृत्यू झाल्यास विमाधारकाच्या कुटुंबाला २ लाख रुपयांपर्यंतची आर्थिक मदत प्रदान करते. तुम्ही फक्त ४३६ रुपये वार्षिक प्रीमियम भरून या योजनेचा लाभ घेऊ शकता. ही पॉलिसी खरेदी करण्यासाठी, तुमचे किमान वय १८ वर्षे निश्चित केले आहे, तर कमाल वय ५५ वर्षे निश्चित केले आहे. विमा प्रीमियम खातेदाराच्या खात्यातून स्वयंचलितपणे डेबिट केला जातो. या योजनेची घोषणा केंद्रीय अर्थसंकल्प २०१५-१६ दरम्यान करण्यात आली होती.

### प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना

भारतातील मोठ्या लोकसंख्येचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने २०१५ मध्ये प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना सुरू करण्यात आली. यापूर्वी त्याचा वार्षिक प्रीमियम १२ रुपये होता, जो १ जून २०२२ पासून वाढवून २० रुपये करण्यात आला आहे. या योजनेत तुम्हाला २ लाख रुपयांचे अपघात विमा संरक्षण मिळते. जर तुमचे वय १८ ते ७० वर्षांच्या दरम्यान असेल, तर तुम्ही ही संरक्षण विमा योजना खरेदी करू शकता जी वर्षाला फक्त २० रुपये देऊन २ लाख रुपयांपर्यंतचे संरक्षण देते.

### आयुष्मान भारत योजना

देशातील गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने मोदी सरकारने आयुष्मान भारत योजना सुरू केली आहे. या योजनेत आयुष्मान कार्डधारकांना ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची सुविधा मिळते. औषधे, उपचार आदींचा खर्च सरकार उचलते. या योजनेसाठी पात्र असलेले लोक त्यांचे उपचार आयुष्मान कार्डद्वारे सरकारने सूचीबद्ध केलेल्या रुग्णालयांमध्ये मोफत मिळवू शकतात. या योजनेचा विस्तार करण्यासाठी केंद्र सरकार 'आयुष्मान भव' मोहीम देखील चालवत आहे, ज्या अंतर्गत पात्र लोकांसाठी आयुष्मान कार्ड बनवले जात आहे.

### अटल पेन्शन योजना

अटल पेन्शन योजना ही भारतातील नागरिकांसाठी असंघटित क्षेत्रातील कामगारांवर लक्ष केंद्रित करणारी पेन्शन योजना आहे. केंद्र सरकारद्वारे चालवल्या जाणाऱ्या या पेन्शन योजनेत १८ वर्षे ते ४० वर्षे वयापर्यंत गुंतवणूक करावी लागते. या योजनेद्वारे वयाच्या ६० वर्षांनंतर प्रत्येक महिन्याला कमाल ५००० रुपयांपर्यंतचे पेन्शन मिळू शकते. पेन्शनची रक्कम तुमच्या गुंतवणुकीवर अवलंबून असते. भारतातील कोणताही नागरिक PY योजनेत सामील होऊ शकतो. यासाठी त्याचे पोस्ट ऑफिस/बचत बँकेत बचत खाते असावे. तुमच्या ठेवीनुसार सरकार त्यात काही पैसेही टाकते. यानंतर वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यावर सरकार तुम्हाला पेन्शन देण्यास सुरुवात करते.

### जन-धन योजना


जन-धन योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील लोक बँकांमध्ये शून्य शिल्लक खाती उघडू शकतात. चेकबुक, पासबुक, अपघात विमा याशिवाय सर्वसामान्यांना जन-धन बँक खात्यावर ओव्हरड्राफ्टची सुविधाही मिळते. ओव्हरड्राफ्ट सुविधेअंतर्गत, जन-धन खातेधारक त्यांच्या खात्यात शिल्लक नसतानाही १०,००० रुपये काढू शकतात. आर्थिक समावेशन हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. म्हणजे देशातील सर्वात गरीब लोकांनाही बँकिंग व्यवस्थेशी जोडता येते. ■

# 'तेथे' मंदिरच होते

● डॉ. के. के. मोहम्मद

> तुम्ही मुसलमान असाल तर तुम्ही हिंदू असल्याची कल्पना करा आणि समस्येकडे बघून, ती सोडविण्याचा प्रयत्न करा. आम्ही सर्व वेगवेगळ्या धर्माचे आहोत, हा एक अपघात आहे, योगायोग आहे हे लक्षात ठेवा.

**समोरून** एक प्रश्न आला– ''आम्ही या तीनही जागा हिंदूंना सोपविल्या आणि नंतर विहिंपने तीन हजार जागांची मागणी केली तर? त्यांची यादी फारच मोठी नाही का?'' मी उत्तरलो– ''आपण सलोख्याच्या, समेटाच्या मार्गावर आहोत. वाटाघाटीतून शांततेची पहाट उगवेल, अशी आपल्याला आशा आहे. अवाजवी मागण्यांच्या विरुद्ध उभे राहण्याची मुसलमानांना गरजच पडणार नाही. हिंदूच ते काम करतील. हिंदुत्वाची हीच तर महानता आहे. हे लक्षात ठेवा की, बजरंग दल, विहिंप, रामसेना इत्यादी कट्टरपंथी हिंदू संघटनांना सर्वसामान्य हिंदू समाजात स्वीकार्यता नाही.'' बाबरी मशिदीवरील दावा सोडून ती हिंदूंना सोपविल्याने समस्या सुटू शकते, या माझ्या प्रतिपादनाशी उपस्थित श्रोतृवृंद सहमत झाला असल्याचे मला जाणवले. पण उघडपणे कुणीच मान्य केले नाही. बरेचदा शरीराच्या हावभावावरून मनातील भाव समजून येतात. कार्यक्रमानंतर आयोजकांनी मला एका लहानशा खोलीत नेले आणि विचारले– ''तुम्ही ही सर्व वस्तुस्थिती सय्यद शहाबुद्दीनसारख्या वरिष्ठ नेत्यांना का सांगत नाहीत?'' तोपर्यंत मी शहाबुद्दीन यांना ओळखत नव्हतो. नंतर शाह सुरी मकबऱ्याच्या घटनेनंतर मी त्यांच्या संपर्कात आलो आणि त्यानंतर मी त्यांना माझे म्हणणे सविस्तर लिहून पाठविले होते. असो. भारतात अनेक पंथ-संप्रदाय आहेत. युरोपात संप्रदायनिष्ठा बर्याच प्रमाणात कमी झाली आहे. पश्चिमेकडे जे संप्रदाय आजही अस्तित्वात आहेत ते



केवळ वारसा व संस्कृती म्हणून. लक्षात ठेवा, हिंदूंमधील वाढत्या असहिष्णुतेविरुद्ध बहुसंख्य हिंदूंनीच आवाज उठविला आहे. तसेच दादरी येथे जे घडले अशा अत्याचारांविरुद्धदेखील. पुरस्कार परत करून त्यांनी वाढत्या असहिष्णुतेला आळा घातला आहे. इन्फोसिसचे नारायण मूर्ती व आरबीआय गव्हर्नर रघुराम राजन यांनीदेखील प्रतिक्रिया दिल्या आहेत. भारतात जीवनाच्या प्रत्येक अंगावर धर्माचा प्रभाव आहे. प्रत्येक धर्माचे त्याचे स्वत:चे असे शिल्पशास्त्र आणि बांधकाम तंत्रज्ञान असते. या सर्व सांस्कृतिक आदानप्रदानाचा भारतात संगम झाला आहे. या सर्व परिवर्तनाची आधारशिला हिंदू संस्कृती आहे. बौद्ध आणि जैन संप्रदाय हिंदुत्वाच्या शाखा आहेत. इस्लामिक वास्तुशास्त्राने हिंदू-बौद्ध-जैन आधारशिलेचे सौंदर्य वाढविले आहे. या सौंदर्याला ख्रिश्चन वास्तुशास्त्राने अधिक संपन्न केले आहे. कुतुबमिनार व ताजमहाल ही याची उदाहरणे आहेत. मिनार व घुमट यांचे उगमस्थान इराण, इराक व तुर्कस्थान आहे. परंतु, त्यांच्याकडे कुतुबमिनारच्या तोडीची एकही वास्तू नाही का? ताजमहालची कमीतकमी एखादी प्रतिकृतीदेखील ते का बांधू शकले नाहीत? भारत हे करू शकला. कारण, आम्ही भारतीय हस्तकलेचे इस्लामिक वास्तुकलेशी मिश्रण करू शकलो. आम्ही संयुक्त संस्कृतीत जगत आहोत. प्रत्येक मोहम्मदामध्ये ब्रह्मदत्त असावा आणि प्रत्येक ब्रह्मदत्तात मोहम्मद. आम्ही भारतात अशी संयुक्त संस्कृती निर्माण केली पाहिजे.

**समाप्त**

**श्री. मोहम्मद हे निवृत्त पुरातत्त्व संचालक (उत्तर भारत) आहेत. (अनुवाद– विशाल फुटाणे)**

## इचलकरंजी अल्पसंख्याक आघाडी शहर कार्यकारिणी

इचलकरंजी शहर कार्यालय येथे शहराध्यक्ष पै.अमृतमामा भोसले यांच्या नेतृत्वाखाली अल्पसंख्याक आघाडीची शहर कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यावेळी अल्पसंख्याक आघाडी शहराध्यक्ष अलीहुसेन खान, सरचिटणीस राजेश रजपुते, उत्तम चव्हाण, माजी नगरसेवक मनोज साळुंखे उपस्थित होते. सरचिटणीसपदी जिलानी सुलेमान टाकवडे, उपाध्यक्षपदी जाबीरअलि जमालुद्दीन शेख, नदीम सत्तार शेख, शाहरुख मारूफ खान, राजू नूर मोहम्मद मोमीन, अमन दस्तगीर शिरगावे, सुफियान मोहीन खान खजिनदार पदी निवड केली. या कार्यक्रमास आकाश मुल्ला, ॲड.भरत जोशी, अशोक पुरोहित, महिला अध्यक्षा सौ.अश्विनी कुबडगे, शमा कोतवाल, रेश्मा शेख, अश्विनी पारसे, संजय गेजगे, दिपक कडोलकर, दिपक पाटील, प्रविण बनसोडे, प्रकाश खरगे, गुलाम मोहम्मद अब्दुल रशीद शहा, मोहम्मद जैद मुनीर अहमद मुल्ला, गैभी साब अब्दुल मंडगनूर, रसूल बालेचंदे, तनवीर मोहम्मद गवंडी, अश्फाक सुतार, दिलावर बाबू लाटकर, अमीर इस्राक मोमीन, मिहिर अजित मुजावर, सरदार गणी खलिफा, लियाकत आदम फिरजादे, सलमान हुसेन मुगळे, युनूस बाबू साहब शेख, शब्बीर नदाफ, सोहेल हमीद मोमीन, युसुफ दस्तगीर मोमीन, आसिफ इब्राहिम मुजावर, शकील मौला जमादार आदी उपस्थित होते. ■

## कोल्हापूर जिल्हा कार्यालयात महिला आरोग्य शिबीर

**कोल्हापूर:** जागतिक महिला दिनाचे औचीत्य साधून भारतीय जनता पार्टीच्या वतीने महिलांसाठी मोफत स्त्रीरोग तपासणी शिबीर उत्साहात संपन्न झाले. मान्यवरांच्या हस्ते भारतमाता प्रतिमा पूजन करून या शिबिराची सुरवात करण्यात आली. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष विजय जाधव, प्रदेश सचिव महेश जाधव,राहूल चिकोडे, सरचिटणीस डॉ. राजवर्धन, गायत्री राऊत, संगीता खाडे, डॉ.शिवानंद पाटील, डॉ.कौस्तुभ वाईकर, डॉ.सचिन चौगले यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिराच्या सुरवातीला भाजपा वैद्यकीय आघाडीच्यावतीने डॉक्टर क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉ.राधिका नंदकुमार जोशी, डॉ. मंजुश्री श्रीनिवास रोहिदास, डॉ.मधुरा मिलिंद कुलकर्णी, डॉ.स्वाती हरिश नांगरे, डॉ.अश्विनी बाळासाहेब माळकर, डॉ.वहिदा दिलखुश तांबोळी यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विजय आगरवाल, सुधीर हराळे, संतोष माळी, सुभाष माळी, सनी आवळे, प्रवीणचंद्र शिंदे, शशिकांत रणवरे, डॉ.आनंद गुरव, डॉ.श्वेता गायकवाड, अश्विनी गोपुगडे, तेजस्विनी पार्टे, कोमल देसाई, समयश्री अय्यर, सुष्मिता प्रभूदेसाई, डॉ.श्रीकांत सागावकर उपस्थित होते. ■

## पंचायत राज, ग्रामीण विकास विभाग पदाधिका-यांना नियुक्तीपत्र वाटप

**नाशिक:** सिडको पंचायत राज आणि ग्रामीण विकास विभाग मंडल संयोजिका अर्चना आहेर यांनी नुकतीच कार्यकारिणी जाहीर केली असून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना आ. सीमाताई हिरे यांच्या हस्ते व उत्तर महाराष्ट्र संयोजक डॉ.प्रशांत भदाणे, ज्ञानेश्वर पिंगळे, कुंदन खरे, रश्मी हिरे, सिडको रवी पाटील, अर्चना दिंडोरकर, ॲड. परमानंद पाटील, गणेश ठाकूर, रूपाली नेरे, जयश्री धारणकर, वर्षा शिंपी, नंदन खरे, महेंद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी कार्यकारिणीत सज्योती भदाणे, चंदा महाले, स्वाती जाधव, शिला संधानशी, कोकीळा जंजाळ, जतीन टोणगांवर, हर्षल इंगळे, सुशिल पाठक, कैलास सुर्यवंशी आदी. पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. ■

## व्दारका मंडल युवा मोर्चा कार्यकारिणी

**नाशिक:** व्दारका मंडलाची युवा मोर्चा कार्यकारणी अध्यक्ष ऋषिकेश शिरसाठ यांनी घोषित केली.

**अध्यक्ष–** ऋषिकेश शिरसाठ, **उपाध्यक्ष–** हेरंब सोनटक्के, सिध्देश विधाते, मनिष कडवे, गणेश गोवर्धने, अनिकेत बनकर, सचिन चव्हाण, योगेश घुगे, पियुष घोडके.

**सरचिटणीस–** संकेत खोडे, विकास एखंडे, दिपक जोशी, आकाश रसाळ. **चिटणीस–** क्षितिज खरात, जीवन लोहारकर, आकाश खाताळे, विशाल बडोदे, प्रसाद देशपांडे, आबिद मौंदे, जय माळी, पवन कंठे, महेश कुलकर्णी. **कोषाध्यक्ष–** ऋतुराज वाघ **प्रसिध्दी प्रमुख–** अव्दैत शुक्ल **सोशल मिडीया प्रमुख–** पार्थ कुलकर्णी **विद्यार्थी संयोजक –** रौनकसिंग ग्रोवर. ■

# रेल्वे स्थानकांचा अभूतपूर्व कायापालट

**भारतातील** रेल्वे स्थानकांची स्थिती नजीकच्या काळात आमूलाग्र बदलणार आहेत. भारतीय रेल्वेची जी स्थानके कैक दशके त्याच स्थितीत आहेत आणि काही स्थानके तर अगदी शतकाहून अधिक काळ त्याच स्थितीत आहेत, ती सर्व स्थानके अमृत भारत स्थानक योजने अंतर्गत आता कात टाकून अभूतपूर्व परिवर्तनासाठी सज्ज आहेत. देशातील १३०० हून अधिक रेल्वे स्थानकांचा कायापालट करण्याच्या केंद्राच्या महत्त्वाकांक्षी योजनेला २६ फेब्रुवारी २०२४ रोजी आणखी चालना मिळाली जेव्हा पंतप्रधानांनी ५५३ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासासाठी पायाभरणी केली. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये पंतप्रधानांच्या हस्ते पायाभरणी करण्यात आलेल्या ५०८ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाचे काम प्रगतीपथावर आहे.

अमृत भारत स्थानक योजना लाखो प्रवाशांना प्रवासाचा सुखद अनुभव देण्याच्या उद्देशाने भारतीय रेल्वेच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करण्यासाठी सुरु असलेल्या एकत्रित प्रयत्नांचे प्रतीक आहे. या योजनेत सौंदर्यदृष्ट्या डिझाइन केलेला स्थानकाचा दर्शनी भाग, रीसरफेस केलेले रेल्वे फलाट, सुंदर लँडस्केपिंग, रूफ प्लाझा, कियॉस्क, उपहारगृह, मुलांसाठी खेळण्याची जागा यासारख्या आधुनिक प्रवासी सुविधा निर्माण करण्याची कल्पना आहे. प्रवाशांचा स्थानकात सहज प्रवेश सुनिश्चित करण्याच्या प्रयत्नांमध्ये रस्ते रुंदीकरण, अनावश्यक संरचना काढून टाकणे, योग्य आरेखन असलेली मार्गदर्शनपर चिन्ह फलक लावणे, समर्पित पादचारी मार्ग स्थापित करणे आणि पार्किंग सुविधा वाढवणे, तसेच सुधारित प्रकाश व्यवस्था करणे यांचा समावेश होतो.

अमृत भारत स्थानक योजनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पुनर्विकसित स्थानक इमारतींचे डिझाईन स्थानिक संस्कृती, वारसा आणि वास्तुकला यांपासून प्रेरित असेल. जसे की. अहमदाबाद स्थानक मोढेरा येथील सूर्य मंदिरापासून प्रेरित असेल, तर द्वारका स्थानक द्वारकाधीश मंदिरापासून प्रेरित असेल. याशिवाय, गुरुग्राम स्टेशन माहिती तंत्रज्ञान संकल्पनेवर आधारित असेल, तर ओडिशातील बालेश्वर स्थानक भगवान जगन्नाथ मंदिराच्या संकल्पनेवर आधारित असेल. तमिळनाडूतील कुंभकोणम



स्थानकावर चोल वास्तुकलेचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आढळून येईल.

पुनर्विकासाधीन असलेल्या स्थानकांपैकी, पुरी येथील स्थानक जगन्नाथ मंदिराच्या स्थापत्यकलेने प्रेरित आहेत, तर तामिळनाडूमधील मदुराई आणि रामेश्वरमची स्थानके अनुक्रमे मदुराई मीनाक्षी आणि रामनाथस्वामी मंदिरापासून प्रेरित आहेत. कोटद्वारचे रेल्वे स्थानक थंड हवेच्या ठिकाणाच्या वास्तुकलेपासून प्रेरित आहे, तर उदयपूर स्थानकात उम्मेद भवन पॅलेसपासून प्रेरित घुमट बांधण्यात येत आहे. दिल्ली एनसीआरमधील फरिदाबाद, गाझियाबाद, सफदरजंग आणि बिजवासन यांसारखी स्थानके प्रयागराज, भुवनेश्वर, सिकंदराबाद आणि चेन्नई एग्मोर या स्थानकाप्रमाणेच आधुनिक दिसतील. हैदराबादमधील हायटेक सिटी स्थानकाला आधुनिक डिझायनर रुप देण्यात आले आहे तर बेंगळुरूमधील-यशवंतपूर आणि बेंगळुरू कँट ही दोन स्थानकांचे विमानतळासारखे स्वरूप आहे. ज्यावेळी गांधीनगर हे स्थानक सर्व आधुनिक सुविधांनी परिपूर्ण आधुनिकीकरण झालेले आणि पंचतारांकित हॉटेल असलेले पहिले रेल्वे स्थानक बनले, तेव्हापासूनच म्हणजे २०२१ सालापासूनच अमृत भारत स्थानक योजनेचा उगम झालेला दिसून येतो. नंतर त्याच वर्षी, पूर्वी हबीबगंज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राणी कमलापती रेल्वे स्थानकाने आधुनिक रूप धारण केले. २०२२ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने तीन प्रमुख रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकासाला मंजुरी दिली, त्यात नवी दिल्ली रेल्वे स्थानक, अहमदाबाद रेल्वे स्थानक आणि युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळ म्हणून ओळखले जाणारे मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस यांचा समावेश होता. ■

# पीएम-सूर्य घर: मोफत वीज योजनेअंतर्गत एक कोटी घरांमध्ये छतांवर सौर पॅनल बसवण्याची योजना

**योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये**

घरगुती सौर पॅनलसाठी केंद्रीय आर्थिक सहाय्य

या योजनेअंतर्गत २ kW क्षमतेच्या प्रणालीसाठी खर्चाच्या ६०% आणि २ ते ३ kW क्षमतेच्या प्रणालीसाठी अतिरिक्त प्रणाली खर्चाच्या ४०% केंद्रीय आर्थिक सहाय्य प्रदान केले जाईल. सध्याच्या प्रमाणित किंमतीनुसार, १ kW क्षमतेच्या प्रणालीसाठी ३०,००० रुपयांचे अनुदान, २ kW क्षमतेच्या प्रणालीसाठी ६०,००० रुपयांचे अनुदान,३ kW आणि त्याहून अधिक क्षमतेच्या प्रणालीसाठी ७८,००० रुपयांचे अनुदान, दिले जाईल.

सर्व कुटुंबाना राष्ट्रीय पोर्टलच्या माध्यमातून अनुदानासाठी अर्ज करता येईल आणि छतावर सौर पॅनल बसवण्यासाठी योग्य विक्रेत्याची निवड करता येईल. हे राष्ट्रीय पोर्टल कुटुंबाना योग्य प्रणालीचे आकारमान, लाभाचा अंदाज, विक्रेत्याचे मानांकन इत्यादींविषयी सम र्पक माहिती देऊन निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत त्यांना सहाय्य करेल. कुटुंबांना त्यांच्या छतांवर सध्या ३ kW पर्यंतच्या सौर पॅनल सिस्टीमच्या स्थापनेसाठी सुमारे ७% इतक्या तारण–मुक्त कमी व्याजदर असलेल्या कर्जाचा लाभ घेता येईल.

**योजनेची इतर वैशिष्ट्ये**

देशभरातील प्रत्येक जिल्ह्यात एकआदर्श सौर ग्राम विकसित केले जाईल. हे गाव ग्रामीण भाग, शहरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायत राज समित्यांमध्ये त्यांच्या भागात छतावरील सौर पॅनेल बसवण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी एक आदर्श उदाहरण ठरेल.

शहरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायत राज समित्यांना त्यांच्या क्षेत्रात छतावर सौर पॅनेल बसवण्याला प्रोत्साहन देण्यासाठी प्रोत्साहनांचा फायदा होईल.

ही योजना नवीकरणीय ऊर्जा सेवा कंपनी (RESCO) वर आधारित मॉडेल्ससाठी देयक सुरक्षिततेसाठी तसेच आरटीएसमधील नाविन्यपूर्ण प्रकल्पांसाठी निधी प्रदान करते.

**फलनिष्पत्ती आणि परिणाम**

या योजनेच्या माध्यमातून कुटुंबाना आपल्या वीज



बिलात बचत करता येईल तसेच वितरण कंपन्यांना अतिरिक्त विजेची विक्री करून अतिरिक्त उत्पन्न मिळवता येईल. ३ kW क्षमतेच्या प्रणाली द्वारे एका कुटुंबाला दरमहा सरासरी ३०० युनिट्स विजेची निर्मिती करता येईल. या प्रस्तावित योजनेमुळे निवासी क्षेत्रात छतांवरील सौर पॅनेलद्वारे ३० GW सौर क्षमतेच्या व्यतिरिक्त, १००० BUs वीज निर्मिती होऊ शकेल आणि परिणामी रूफटॉप व्यवस्थेच्या २५ वर्षांच्या कार्यकाळात ७२० दशलक्ष टन इतके कार्बन डाय ऑक्साइडचे उत्सर्जन कमी होईल. या योजनेमुळे दळणवळण, पुरवठा साखळी, विक्री, स्थापना, संचालन आणि देखभाल आणि इतर क्षेत्रात मिळून सुमारे १७ लाख थेट रोजगार उपलब्ध होतील असा अंदाज आहे.

**पीएम–सूर्य घर: मोफत वीज योजनेचे लाभ मिळवणे**

केंद्र सरकारने या योजनेच्या उदघाटनानंतर लगेचच जनजागृती करण्यासाठी आणि इच्छूक कुटुंबाना अर्ज सादर करता यावेत या उद्देशाने मोठी मोहीम सुरु केली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी कुटुंब https://pmsuryaghar.gov.in वर स्वतःची नोंदणी करू शकतात. ■

# सांगोल्याच्या डाळिंबाची प्रायोगिक तत्वावरील व्यावसायिक खेप समुद्रमार्गे अमेरिकेला रवाना

**भारताने** २८ फेब्रुवारी २०२४ रोजी डाळींबाची पहिली प्रायोगिक तत्वावरील व्यावसायिक खेप समुद्रमार्गे यशस्वीरित्या अमेरिकेला रवाना केली. कृषी आणि प्रक्रियाकृत खाद्य उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाच्या (अपेडा) झेंड्याखाली आयएफसी सुविधा, एमएसएएमबी, वाशी (नवी मुंबई) येथील आयएनआय फार्म्सद्वारे ही खेप पाठवण्यात आली. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव राजेश अग्रवाल आणि अपेडाचे अध्यक्ष अभिषेक देव यांनी डाळिंबाच्या ४२०० पेट्यांच्या (१२.६ टन) खेपेला हिरवा झेंडा दाखवला.

अपेडाने गेल्या वर्षी तांत्रिक भागीदार म्हणून आयसीएआर-एनआरसी डाळिंब सोलापूरच्या सहकार्याने किरणोत्सर्ग प्रक्रिया आणि स्थिर चाचणीसह डाळिंबाची हवाई खेप यशस्वीरित्या पाठवली होती. या यशस्वी प्रयोगानंतर, अपेडाने भारतीय डाळिंबाच्या संभाव्य बाजारपेठेसाठी सागरी व्यापार संबंधाच्या माध्यमातून डाळींब पाठवण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. भारत, जगातील सर्वात मोठ्या डाळींब उत्पादकांपैकी एक आहे आणि आता जगातील डाळींब निर्यातीत आघाडीवर असलेल्या देशांपैकी एक होण्याचे त्याचे उद्दिष्ट आहे. युरोपीय महासंघ, आखाती देश आणि आशियाई बाजारपेठांमध्ये वाढत असलेला भारत हा एक प्रमुख देश आहे.

अपेडा नोंदणीकृत आयएनआय फार्म्सने या प्रायोगिक हवाई खेप, सागरी खेप आणि सागरी कंटेनरचे कार्यान्वयन केले आहे. ही कंपनी भारतातील फळे आणि भाज्यांचे सर्वोच्च निर्यातदार असून त्यांची उत्पादने जगभरातील २५ हून अधिक देशांमध्ये निर्यात केली जात आहेत. या कंपनीने गेल्या काही वर्षांमध्ये जागतिक बाजारपेठेतील कठोर मानकांची पूर्तता करण्यासाठी, डाळिंबाची गुणवत्ता आणि साठवण वाढवण्याकरता व्यापक प्रयत्न केले आहेत. एग्रोस्टार समूहाचा एक भाग म्हणून, आयएनआय फार्म्सने महाराष्ट्र, गुजरात आणि राजस्थान या राज्यांमधील शेतकऱ्यांसोबत थेट काम करून डाळिंबासाठी मूल्य साखळी स्थापन केली आहे. महाराष्ट्रातील सांगोला येथील अनार्नेट नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून ही डाळिंब घेतली



आहेत. इतर निर्यात बाजारांच्या तुलनेत शेतकऱ्यांना मिळणारा हप्ता २० टक्के आणि देशांतर्गत बाजारपेठेच्या तुलनेत ३५ टक्के होता, हे लक्षणीय आहे.

डाळिंब हे भारताचे एक महत्त्वाचे कृषी-उत्पादन आहे, फळांशी संबंधित समृद्ध इतिहास आणि त्याचे पोषणमूल्य त्याच्या लोकप्रिय मागणीमध्ये योगदान देते. मऊ मांसल बिया, कमी आम्लता आणि आकर्षक रंगासह गुणवत्तेच्या दृष्टीने डाळिंबाच्या काही सर्वोत्तम जातींचे उत्पादन भारत करतो. भगवा डाळिंब हे जगभरातील सर्वोत्तम जातींपैकी एक मानले जाते. गेल्या दशकात भारताने डाळिंबाचे क्षेत्रफळ तसेच उत्पादन वाढवले आहे आणि निर्यातीत वाढ झाली आहे. डाळिंबाच्या बाजारपेठेत, उत्तम दर्जाच्या उत्पादनासाठी प्रशिक्षित शेतकऱ्यांसह वर्षभर डाळिंबाचा पुरवठा करण्यास सक्षम असण्याचा भारताला महत्त्वपूर्ण फायदा होतो. नजीकच्या वर्षांत डाळिंबाचे उत्पादन २०-२५% च्या निकोप दराने वाढत आहे. भारतात महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, राजस्थान आणि आंध्र प्रदेश ही डाळिंब उत्पादन करणारी प्रमुख राज्ये आहेत. यात महाराष्ट्राचा वाटा ५० टक्क्यांहून अधिक आहे. अपेडाने २०२२-२३ मध्ये संयुक्त अरब अमिराती (यू. ए. ई.), बांगलादेश, नेपाळ, नेदरलँड्स, सौदी अरेबिया, श्रीलंका, थायलंड, बहरीन आणि ओमानला ५८.३६ दशलक्ष अमेरीकी डॉलर्स किमतीच्या डाळिंबाची निर्यात केली आहे. डाळिंबाच्या निर्यातीसाठी पुरवठा साखळीतील अडथळे दूर करण्याकरिता अपेडा सक्रियपणे काम करत आहे; डाळिंबासाठी निर्यात प्रोत्साहन मंच (ईपीएफ) स्थापन करणे हे डाळिंबाच्या निर्यातीला चालना देणारे आहे. ■

# जगातील सर्वात मोठी धान्य साठवणूक योजना

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी २४ फेब्रुवारी २०२४ रोजी जगातील सर्वात मोठ्या सहकारी धान्य साठवणूक योजनेच्या पायलट प्रकल्पाचे उद्घाटन केले. ही योजना 'सहकार से समृद्धी कार्यक्रम'अंतर्गत सुरू करण्यात आली आहे.

**धान्य साठवणूक योजनेचे उद्दिष्ट:**

● पीएसीएसला नाबार्डशी जोडून ते कार्यान्वित करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

● त्यामुळे कोट्यवधी अल्पभूधारक शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

● या प्रकल्पासाठी नाबार्डने राष्ट्रीय स्तरावरील कॉमन सॉफ्टवेअर विकसित केले आहे. हे देशभरातील झपाट्याने अनेक गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केले गेले आहे.

● १.२५ लाख कोटी रुपये खर्चून ७०० लाख मेट्रिक टनांची जगातील सर्वात मोठी साठवण योजना पुढील पाच वर्षांत पूर्ण केली जाईल.

● यामुळे शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल साठवून ठेवता येईल आणि गरजेनुसार त्याची योग्य वेळी विक्री करता येईल आणि बँकांकडून कर्ज घेण्यासही मदत होईल.

**११ राज्यांमधून ११ पीएसीएसचे ऑपरेशन:**

● पंतप्रधानांनी ११ राज्यांतील ११ प्राथमिक कृषी पतसंस्था (पीएसीएस) मध्ये 'सहकार क्षेत्रातील जगातील सर्वात मोठी धान्य साठवणूक योजना' या पथदर्शी प्रकल्पाचे उद्घाटन केले.

● 'सहकार से समृद्धी कार्यक्रम' अंतर्गत देशभरात धान्यसाठा उभारण्यात आला आहे. हे ११ राज्यांमधील ११ प्राथमिक कृषी पतसंस्था (पीएसीएस)मध्ये कार्यरत आहे.

● या उपक्रमाचा एक भाग म्हणून, गोदामे आणि इतर कृषी पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या उद्देशाने पंतप्रधानांनी देशभरात अतिरिक्त ५०० पीएसीएस (प्राथमिक कृषी सहकारी संस्था) बांधण्याची सुरुवात केली.

**पीएसीएससाठी २,५०० कोटी अर्थसंकल्प मंजूर**

● अन्नधान्य पुरवठा साखळीसह गोदामांचे अखंडपणे समाकलित करणे आणि अन्न सुरक्षा मजबूत करणे हे पीएसीएसचे उद्दिष्ट आहे.

● पंतप्रधान मोदींनी देशभरातील १८ हजार पीएसीएसच्या संगणकीकरणाच्या प्रकल्पाचे उद्घाटनही केले.

● या महत्त्वाच्या प्रकल्पासाठी केंद्र सरकारने २,५०० कोटी रुपयांचे बजेट मंजूर केले आहे.

● यावेळी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा म्हणाले की, २४ फेब्रुवारीपासून १८,००० पेक्षा जास्त पीएसीएसचे संपूर्ण संगणकीकरण होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झाल्यानंतर प्रत्येक व्यवहार संगणकाचा वापर करून सुरू होईल.

● अत्यंत कमी वेळेत ६५,००० पैकी १८,००० पीएसीएसमध्ये संगणकीकरण केले जात आहे. ते आणखी ३०,००० पॅकमध्ये लागू केले जाईल आणि निवडणुकीपूर्वी लोकांना समर्पित केले जाईल.

● पीएसीएसच्या संगणकीकरणामुळे केवळ पारदर्शकता आणि आधुनिकीकरण होणार नाही तर अनेक व्यवसायाच्या संधीही निर्माण होतील.

● सहकार मंत्रालयाने पीएसीएससाठी नवीन उपविधी बनवले आहेत. देशभरातील राज्य सरकारांनी, आपापल्या पक्षांपेक्षा वरचेवर उठून, हे उपविधी राज्य यादीतील विषय असूनही ते स्वीकारले आणि लागू केले. उपविधी लागू होताच, प्राथमिक कृषी पतसंस्था (पीएसीएस) २० प्रकारची नवीन कामे करू शकतील.

● आतापासून, पीएसीएस अनेक नवीन क्षेत्रांमध्ये काम करण्यास सक्षम असेल ज्यामध्ये प्रामुख्याने खालील गोष्टींचा समावेश आहे:

● दुग्धव्यवसाय देखील करू शकतील.

● ब्लू रिव्होल्युशनमध्येही सहभागी होता येईल

● जलजीवन अभियानांतर्गत जलव्यवस्थापनाचे काम ही करणार आहे.

● साठवण क्षमता वाढण्यासही हातभार लागेल

● कॉमन सर्व्हिस सेंटर (सीएससी) म्हणूनही काम करेल.

● स्वस्त औषधे आणि धान्याची दुकाने उघडू शकतील आणि पेट्रोल पंपही चालवू शकतील.

● नवीन उपनियमांद्वारे, अनेक कामांसह पीएसीएसला जोडण्याची प्रक्रिया सुरू झाली. आता त्यांच्या संगणकीकरणामुळे सर्व कामांचा लेखाजोखा एकाच सॉफ्टवेअरमध्ये एकत्रित करण्यात आला आहे. हे सॉफ्टवेअर देशातील प्रत्येक भाषेत शेतकऱ्याशी बोलू शकते. ■



मुंबई– मुस्लिम महिला मेळावा– उपस्थिती– उत्तर प्रदेश सरकारचे अल्पसंख्याक मंत्री दानिश अंसारी, प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर, अल्पसंख्याक मुंबई अध्यक्ष वसिम खान, अल्पसंख्याक सरचिटणीस रिदा रशीद, एस.एम.खान, प्रदेश उपाध्यक्ष दौलत खान आदी.

**परभणी–अल्पसंख्याक समाजातील युवक–युवतींसाठी पंडीत दिनदयाल उपाध्याय महारोजगार मेळाव्याचे आयोजन– उपस्थिती–** आ.मेघना बोर्डीकर, विधानसभ प्रभारी संजय शेळके, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष, सुरेश भुमरे, मधुकर गव्हाणे, सुनील देशमुख, अब्दूल खालेद, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष संदीप कुलकर्णी, सिंकदर खान आदी.







**माढा (जि. सोलापूर)– ज्येष्ठ कार्यकर्ता प्रकोष्ट प्रदेशच्या वतीने गांव चलो अभियान– उपस्थिती–** ज्येष्ठ कार्यकर्ते गोविंदराव कुलकर्णी, सुरेश खिस्ते, रत्नाकर नाना बेंबळेकर, विठ्ठलराव भणगे, शशिकांत बेंबळेकर, अमोल कुलकर्णी, महादेव बागल, शार्दुल दातार आदी.



**शिराळा विधानसभा मतदार संघ मंडल–मोर्चा व सेल कार्यकारणी पदाधिकारी निवड– उपस्थिती–** प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, हातकणंगले लोकसभा निवडणुक प्रमुख सत्यजित देशमुख, सम्राटबाबा महाडीक, मंडल अध्यक्ष हणमंतराव पाटील, संपतराव देशमुख, रणजितसिंह नाईक, के.डी. पाटील, अशोक पाटील, अभिजित नाईक, दत्तात्रय पाटील, सम्राट शिंदे, वैभवी कुलकर्णी, विद्या पाटील आदी.



**मुंबई– सायन–माटुंगा वॉर्ड क्र. १७७ येथे मतदार नोंदणी अभियान– उपस्थिती–** जेसल कोठारी, जयेश धरमसी, हृतिक सिंह, देवेंद्र संघवी, राहुल छेडा, कलमेश उनाडकट, चेतन कारिया, निलेश शाह, उर्मी सदलानी, राज दमाणी, हरिश शाह, सिद्धार्थ सिंह, सागर निगवले, मधुकांत सावला, कमल मल्होत्रा आदी.

# पासमंद मुस्लिम मेळावा




**धुळे– दोंडाईचा येथे मुस्लिम पासमंदा समाजाचा मेळावा– उपस्थिती–** आ.जयकुमार रावल, अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुल्तानी, अल्पसंख्याक मोर्चाचे सरचिटणीस एजाज शेख, उपनगराध्यक्ष नब्बु पिंजारी, प्रदेश उपाध्यक्ष पप्पु इब्राहिम शेख, अकबर शहा, लियाकत बागवान, तौसिफ खाटीक, अहमद सर, जलील अन्सारी, आरिफ काजी, नुर महम्मद, एकबाल पटेल, मुस्तफा शहा, जाकीर पठाण, फिरोज राजु शेख, अकलाग नागा, हीना बाजी, रिजवाना बाजी.



**नगर– लोकसभा मुस्लिम बहुल बूथ प्रमुखांशी संवाद– उपस्थिती–** अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुल्तानी, प्रदेश उपाध्यक्ष तथा लोकसभा संयोजक सलिम बागवान, जिल्हाध्यक्ष तय्यब बेग, मुसाभाई, समीर पठाण, शाकेर खान आदी.



**सांगली, सातारा,सोलापूर, कोल्हापूर, माढा आणि हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील मुस्लिम बहुल बूथ प्रमुखांशी स्नेह संवाद बैठक– उपस्थिती–** अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुल्तानी, अशरफ वांकर, जाकिर जमादार, आसिफ पटेल, मुन्नाभाई कुरणे, आझम जमादार, आझम मकानदार, अनारकली कुरणे, फारुख जमादार, इम्रान शेख, रियाज वंटमुरे, जाकीर सगरी, पप्पू आत्तार, सादिक तांबोळी, अकील काजी, साजिद अली पठाण, कनिजा सोलकर, बाळासो नाईक आदी.




**पुणे–बारामती–शिरूर आणि मावळ लोकसभा मुस्लिम बहुल बूथ प्रमुखांशी स्नेह संवाद– उपस्थिती–** अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुल्तानी, अशरफ वांकर, आसिफ पटेल, चरणजीतसिंग सेठी, इम्तियाज मोमीन, रफिक भाई, सुलभा कांबळी, जमाल औटी, शाकीर शेख, मुस्तफा पटेल, जस्सी ब्रिजा, नईम शेख, ॲड.अझरुद्दीन मुलाणी, ईशा कोळेकर, श्रुती पाटोळे, फरहाद अत्तार, सलुजा आदी.

# माजी मंत्री पद्माकर वळवी यांचा पक्ष प्रवेश



**काँग्रेसचे माजी मंत्री पद्माकर वळवी यांचा भारतीय जनता पार्टीत प्रवेश- उपस्थिती-** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, आदिवासी विकास मंत्री डॉ.विजयकुमार गावित, ग्रामिण विकास मंत्री गिरीश महाजन, प्रदेश उपाध्यक्ष श्रीमती. स्मिता वाघ, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी आदी उपस्थित होते.



**मोदी सरकारच्या अल्पसंख्याक समाजासाठीच्या विविध योजनांची माहिती देणाऱ्या 'मैं देश नहीं झुकने दूंगा' या अर्शद अली यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते झाले.**



**नांदेड जिल्ह्यातील काँग्रेस नेते मारोतराव कवळे गुरूजी यांचा पक्ष प्रवेश- उपस्थिती-** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आ. राजेश पवार, ज्येष्ठ नेते भाऊराव देशमुख, प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर, माजी आमदार अमर राजुरकर आदी.



**प्रहार दिव्यांग संघटनेचे अनिल पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश- उपस्थिती-** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, दिव्यांग आघाडीचे प्रदेश संयोजक जयसिंग चव्हाण, दिव्यांग आघाडीचे प्रभारी राजेंद्र पुरोहित, हर्षल साने आदी.



**कराड– किसान मोर्चाच्या ग्राम परिक्रमेचा समारोप– उपस्थिती–** प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश उपाध्यक्ष विक्रांत पावसकर, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, किसान मोर्चा प्रदेश अध्यक्ष गणेश भेगडे, सातारा भाजपा जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, कराड उत्तर विधासनभा प्रमुख मनोज घोरपडे, लोकसभा समन्वयक रामकृष्ण वेताळ, प्रमोद गायकवाड, सुनिल काटकर, शंकर शेजवळ, सागर शिवदास, सुनिल शिंदे आदी.

**खानापूर–आटपाडी विधानसभा मतदारसंघात आ. गोपीचंद पडळकर यांचे बूथ प्रमुख संपर्क अभियान– उपस्थिती–** बूथ प्रमुख धिरज पाटील, भाजयुमो जिल्हाध्यक्ष अनिल पाटील, तालुकाध्यक्ष प्रमोद भारते, विटा शहर प्रभारी पंकज दबडे, किशोर डोंबे, संदीप ठोंबरे, शहराध्यक्ष दत्तात्रय तारळेकर, विस्तारक प्रमोद धायगुडे, संतोष यादव, निलेश पाटील, सोहन जाधव, करण जाधव, विक्रम भिंगारदिवे आदी.







**प्रदेश महिला मोर्चाचा महिला साहित्यिक आणि पत्रकार संपर्क– उपस्थिती–** कवी संमेलन महाराष्ट्र प्रमुख सरिता हरपळे, अभिनेत्री आदिती सारंगधर, ज्येष्ठ साहित्यिक शैलजा शेवडे, सत्यभामा सिंग, अन्नपूर्णा गुप्ता, स्वरांगी हेळकर, वी. रोशनी किरण, रीमा सिंग, सीमा त्रिवेदी, नंदिता, अर्चना देसाई, राजवी नाईक, गीतांजली सावे, प्रीति रानी जोगेकर, शैलेजा कोरडे, कल्पना देशमुख आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp










प्रति,

______________________________

______________________________

______________________________

______________________________

**प्रेषक,**

**कार्यालय मंत्री :**

भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com